


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक



राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्य विनम्र अभिवादन

RNI No. - MAHMAR 2023/84526

लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्य विनम्र अभिवादन

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## काही लोक गांधीजींचा विचार विसरले फक्त त्यांच्या नावाने मते घेतली; मोदींचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नवी दिल्ली**

महात्मा गांधी जयंतीनिमित्त पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. स्वच्छतेचा विचार महात्मा गांधींनी दिला होता, पण त्याचा काही लोकांना विसर पडला, असेही ते म्हणाले. पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी जयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांसोबत स्वच्छता अभियानात सहभाग घेतला आणि साफसफाई केली. स्वच्छता अभियानाला दहा वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पंतप्रधान मोदींनी देशाला



संबोधित केले. मोदी म्हणाले की, स्वच्छता मोहिमेंतर्गत जे आपण आज करतोय, ते यापूर्वी का झाले नाही?, असा सवाल त्यांनी केला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, एक मोठा वर्ग होता, ज्याला घाण करणे त्याचा अधिकार वाटत होता. कोणी स्वच्छता करत असेल, तर त्यांना हिणवायचा आणि अंहकाराने जगायचे. जेव्हा मी स्वच्छता करायला लागलो, तेव्हा त्यांना वाटले की, मी जे करतोय तेही मोठे काम आहे. आता अनेक लोक माझ्यासोबत जोडले जात आहेत. स्वच्छ भारत अभियानामुळे मोठे मानसिक परिवर्तन झाले आहे आणि स्वच्छता करणाऱ्यांना आदर मिळत आहे.

**गांधीजींच्या नावाने फक्त मते घेतली**

पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, मन की बात कार्यक्रमात मी जवळपास ८०० स्वच्छता कार्यक्रमांचा उल्लेख केला. लोक स्वच्छता ठेवण्यासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांना पुढे आणत आहेत. मी बघतोय की, जे आज होत आहे, ते यापूर्वी का झाले नाही?

महात्मा गांधींनी तर हा रस्ता दाखवला होता. सुचवलेही होते. काही लोकांनी गांधीजींच्या नावाने फक्त मते घेतली, पण त्यांचा विचार विसरून गेले. ते लोकांनी अस्वच्छतेलाच आयुष्य मानले, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी अप्रत्यक्षपणे काँग्रेसवर निशाणा साधला.

## महाराष्ट्रातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्र सरकारकडून मिळणार १४९२ कोटी निधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नवी दिल्ली**

अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित देशातील १४ राज्यांना केंद्रीय आपत्ती निवारण निधीतून ५ हजार ८५८ कोटी ६० लाखांचा अग्रीम निधी मंजूर करण्यात आला आहे. यात महाराष्ट्रातीलपूरग्रस्तांसाठी सर्वाधिक १ हजार ४९२ कोटी रुपये निधी केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देण्यात आला आहे. याबाबत राज्यातील महायुती सरकारने केंद्र सरकारचे आभार मानलेत.

केंद्र सरकारच्या मदतीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राने केंद्र सरकारकडे काही मागितले की ते लगेचच मिळते, याचा पुन्हा एकदा प्रत्यय



आला. गृहमंत्री अमित शाह यांनी आज राज्यातील शेतकऱ्यांसाठी १,४९२ कोटींचे पॅकेज जाहीर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतकऱ्यांचा उल्लेख नेहमीच अन्नदाता असा करतात. नैसर्गिक आपत्तीच्या काळात विशेष मदत जाहीर करून त्यांनी आपण कोणत्याही संकटात शेतकऱ्यांच्या आणि राज्याच्या पाठीशी आहोत, हे दाखवून दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार व्यक्त केले आहेत असं त्यांनी सांगितले.

तर नुकत्याच वितरीत झालेल्या निधीसह केंद्रीय आपत्ती निवारण निधीतून संबंधित २१ राज्यांना यावर्षी आतापर्यंत एकूण १४ हजार ९५८ कोटींची मदत करण्यात आली आहे. ही बाब आपत्ती निवारणाच्या कार्यात केंद्र सरकार राज्य सरकारांच्या विशेष करुन महाराष्ट्रवासीयांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे दाखविणारी आहे असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. केंद्रीय आपत्ती निवारण निधीतून महाराष्ट्राला १४९२ कोटी, आंध्रप्रदेशला १०३६ कोटी, आसामला ७१६ कोटी, बिहारला ६५५ कोटी ६० लाख, गुजरातला ६०० कोटी, तेलंगनाला ४१६ कोटी ८० लाख आणि पश्चिम बंगालला ४६८ कोटींचा अग्रीम निधी वितरीत करण्यात आला आहे.

## जिल्ह्यातील ७३ पीडित महिलांना शासनाच्या जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

लैंगिक अत्याचार झालेल्या पीडितांना मनोधैर्य योजनेमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. बलात्कार पीडित, लैंगिक अत्याचाराने पीडित बालक, ॲसिड हल्ल्याला बळी पडलेल्या पीडिता, जाळण्याचा प्रयत्न झालेली पीडिता यांना शासनाच्या जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून मदत केली जाते. जिल्ह्यात मागील आठ महिन्याच्या कालावधीत ७३ महिलांना १ कोटी ३१ लाख २८ हजाराची मदत दिली आहे.



**मनोधैर्य योजना ?**

अत्याचार पीडित महिलांना जगण्यासाठी बळ मिळावे, यासाठी २ ऑक्टोबर २०१३ रोजी शासनाने मनोधैर्य योजना कार्यान्वित केली आहे.

**कोणाला मिळते सहाय?**

सामूहिक अत्याचार, ॲसिड हल्ला, पोस्को घटनेतील पीडित, अत्याचारात मृत्यू झाल्यास १० लाख इतर पीडितांना ३ लाख मदत मिळते.

**आठ महिन्यात ७३ महिलांना १.३१ कोटी रुपये**

जिल्हा विधसेवा प्राधिकरण विभागाच्या वतीने जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांमध्ये ७३ अत्याचार पीडित महिलांचे प्रकरणे मंजूर करण्यात आले असून त्यांना १ कोटी ३१ लाख २८ हजार ७५० रुपये इतकी आर्थिक मदत झाल्याचे सांगण्यात आले.

### सखी वन स्टॉपमध्ये समुपदेशन


अत्याचारानंतर जर पीडिता व तिच्या कुटुंबाचे मानसिक बळ देण्यासाठी वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून समुपदेशकाशी समन्वय साधून त्यांना मानसिक आधार दिला जातो. अत्याचार पीडितेसाठी मनोधैर्य योजना राबविण्यात येत आहे. यातून पीडितेला अर्थसहाय्य दिले जाते. आठ महिन्यात ७३ महिलांना अर्थसहाय्य करण्यात आले आहे.

**– मंगला कांबळे, सचिव, जिल्हा विधिसेवा प्राधिकरण**

## हल्ली अर्थ समजेनासा झालाय; महात्मा गांधींचा उल्लेख करत राज ठाकरेंची वाचाळवीरांना फटकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

राज ठाकरे त्यांच्या परखड आणि स्पष्ट बोलण्याच्या शैलीमुळे सर्वांना परिचित आहेत. राज्यात घडणाऱ्या घडामोडींवर राज ठाकरे नेहमीच व्यक्त होत असतात. आजही राज ठाकरेंनी त्यांच्या मनातल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या भावना व्यक्त करताना राज ठाकरे यांनी महात्मा गांधींचा उल्लेख केला आहे.



राज ठाकरेंनी त्यांच्या मनातल्या भावना व्यक्त करताना म्हटले आहे की, आज महात्मा गांधींची जयंती. 'बोलणं हे मौनापेक्षा अधिक प्रभावी ठरणार असेल तर जरूर बोला', असं गांधीजी म्हणायचे. त्यांच्या या म्हणण्यातला 'मौनापेक्षा अधिक प्रभावी ठरणार असेल तर.' याचा खोल अर्थ मात्र हल्ली समजेनासा झाला आहे. प्रत्येक क्षणाला, प्रत्येक गोष्टीवर कुठलाही विचार पूर्ण व्हायच्या आत व्यक्त व्हायचं, हे सध्या सुरु असल्याचे राज यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात वाचाळवीरांना तर फारच बरे दिवस आलेत. काहीही बोललं, कितीही बेताल वक्तव्य केली तरी प्रसिद्धी मिळते हे माहित झाल्यामुळे, असल्यांचा सुळसुळाट झाला आहे आणि हे होतंय कारण माध्यमं यांना प्रसिद्धी देतात आणि त्यात भर पुन्हा सोशल मीडियाची. या सगळ्यात ठेहराव निघून जातो, विचार उरत नाही. त्यामुळे माध्यमांनी पण या क्षणापुरता न विचार करता, पुढच्या अनेक दशकांसाठी आपण काय पेरतोय याचा विचार करायला हवा असा सल्ला राज यांनी दिला आहे.गांधीजींनी जो विचार रुजवला तो त्यांच्या नंतर ७५ वर्षांनी देखील पुसणं शक्य नाही, कारण तो मंथनातून निर्माण झाला होता. याचं महत्व पटणं आणि सारखं व्यक्त होण्याची उर्मी मनातून रिक्त होणे, हीच गांधीजींना खरी श्रद्धांजली ठरेल असे राज यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हणत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची महात्मा गांधीजींच्या स्मृतीस विनम्र अभिवादन असे राज यांनी म्हटले आहे.

## 'तीन नंबरचा गाळ शेतकऱ्यांच्या पोरांना; अजित पवार समर्थक आमदाराची जीभ घसरली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२वरुड**

जित पवारांचे समर्थक आमदार देवेंद्र भुयार यांनी महिलांबाबत एक वादग्रस्त विधान केलं आहे. त्यांनी एका जाहीर कार्यक्रमात बोलताना चांगल्या मुली नोकरदारांना मिळतात, तर दोन नंबरच्या काळ्या मुली पानवाल्यांना मिळातात अशा आशयाचं विधान केल्याने वाद पेटण्याची शक्यता आहे.

पोरगी जर पाहिजे असेल तर पोरगा नोकरीवाला पाहिजे. पोरगी जर स्मार्ट हवी असेल तर ती तुमच्या, माझ्यासारख्या पोरांना भेटत नाही. नोकरीवाल्याला भेटते. दोन नंबरची पोरगी कोणाला भेटते ज्यांचा पान ठेला आहे, धंदा, किराणा दुकान आहे, अशा माणसाला दोन नंबरची पोरगी भेटते आणि तीन नंबरचा गाळ, राहिलेली पोरगी शेतकऱ्यांच्या पोरांना भेटतो, शेतकऱ्यांच्या पोरांचं काही खरं राहिलं नाही असं भुयार म्हणाले आहेत. दरम्यान महिलांविरोधातील या वादग्रस्त वक्तल्यानंतर संताप व्यक्त केला जात असून, राजकीय वर्तुळातून



देखील टीका केली जात आहे.

देवेंद्र भुयार यांचं हे वक्तव्य हे फक्त स्त्रियांचा अवमान करणारे आहे असं नाही, हे वक्तव्य इथल्या कृषी क्षेत्रासाठी काम करणाऱ्या भूमीपुत्रांची टिंगल टवाळी करणारं आहे. परंतु, सध्या शिंदे गटाचे आणि अजित पवार गटाचे लोक यांना बोलण्याचं काही ताळतंत्र राहिलं नाही. या लोकांना वाटतं की कोणतंच पोलीस स्टेशन आमच्यावर कारवाई करू शकत नाही. या मस्तवालपणातून अशी वाक्य येतात. पण शेतकरी आणि महिलांची टींगल करणं हाच तुमचा अजेंडा आहे का? हे एकदा अजित पवार यांना विचारले पाहिजं अशी प्रतिक्रिया शिवसेना(यूबीटी) च्या नेत्या सुषमा अंधारे यांनी दिली आहे.

**दोन वर्षांपूर्वीदेखील भुयारांचे वक्तव्य चर्चेत**

दोन वर्षांपूवी बोलताना देवेंद्र भुयार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कुठल्याही कार्यकर्त्यांना धक्का लावला तर तलवारीने हात छाटल्याशिवाय राहणार नाही. जूना देवेंद्र भुयार अंगात आणला तर तुमची पाटीलकी काढल्याशिवाय राहणार नाही, असा दम विरोधकांना भरला होता. त्यांच्या या वक्तव्याची त्यावेळी राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते.

**अशा आमदारांना लाज वाटली पाहिजे – ठाकूर**

काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर म्हणाल्या की, महिलांच्या मतांसाठी महायुतीमध्ये एवढी चढाओढ सुरू आहे. एवढा गोंधळ घातल असताना त्यांची माणसिकता काय आहे हे दिसून येत आहे. ती काही उपभोगाचे साधन नाही की तुम्ही तिची कॅटगिरी ठरवताल लाज वाटली पाहिजे या अशा आमदारांना बोलायला. अजित पवारांनी त्यांच्या आमदारांना नियंत्रणात ठेवले पाहिजे. त्यांची माणसीकता काय गुंड प्रवृत्तीची आहे हे दिसून आले आहे. महिलांचा अपमान करणे चुकीचे आहे.

## समृद्धी महामार्गावरील अपघात घटले, आरटीओच्या उपाययोजनांना असे आले यशएकूण अपघाताच्या संख्येत १९ टक्के घट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मुंबई ते नागपूर या समृद्धी महामार्गावरील अपघातामुळे चिंता व्यक्त केली जात होती. राज्यातीलच नव्हे तर देशातील सर्वात मोठ्या एक्सप्रेस हायवेवरील अपघाताने आरटीओने या महामार्गावरील गस्त वाढवून वाहनांना शिस्त लावण्यासाठी गेली दोन वर्षे उपाययोजना केल्या त्याला आता हळूहळू यश येत आहे.जानेवारी ते ऑगस्ट २०२३ या आठ महिन्यात समृद्धी महामार्गावर ६३ प्राणांकित अपघातात १२० जणांचा बळी गेला होता. यंदाच्या जानेवारी ते ऑगस्ट २०२४ मध्ये ५७ प्राणांकित अपघातात ८० जणांचा बळी गेला आहे. म्हणजे अपघातात १० टक्के कमतरता झाली आहे. तर एकूण अपघाताच्या संख्येत १९ टक्के घट झाली आहे.

मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावर साल २०२३ मध्ये ८१ प्राणांकित अपघातात १५१ जणांचे प्राण गेले. तर गंभीर जखमी करणारे १७ अपघात



घडले असून त्यात ४२ जण गंभीर जखमी झाले. तर किरकोळ जखमी असणारे २२ अपघात घडले असून ५२ जण किरकोळ जखमी झाले. तर १४ अपघातात कोणीही जखमी झालेले नाही. असे साल २०२३ मध्ये १३४ अपघात घडले असल्याची माहिती परिवहन विभागाने दिली आहे.

जानेवारी ते ऑगस्ट २०२३ या काळात ६३ प्राणांकित अपघात घडले असून त्यात १२० जणांचा मृत्यू झाला. तर याच आठ महिन्याच्या काळात १७ गंभीर जखमी करणारे अपघात घडले असून यात ३० जण जखमी झाले. तर किरकोळ जखमा होणारे २० अपघात घडले असून यात ४० जण किरकोळ जखमी झाले आहेत. तर आठ अपघातात कोणीही जखमी झालेले नाही. अशा प्रकारे आठ महिन्यात गेल्या वर्षी एकूण १०३ अपघात घडले.तर यंदाच्या जानेवारी ते ऑगस्ट २०२४ या आठ महिन्याच्या काळात अपघाताची संख्या घटली असून या काळात ५७ अपघात घडले असून त्यात ८० जण जखमी झाले आहेत. म्हणजे प्राणांकित अपघाताची संख्या १० टक्के घटली आहे. तर १५ गंभीर जखमी होणारे अपघात घडले असून त्यात ३९ जण गंभीर जखमी झाले आहेत. म्हणजे गंभीर अपघाताच्या संख्येत २५ टक्के तर गंभीर जखमींच्या संख्येत ३० टक्के कमी झाली आहे.

तर किरकोळ जखमी होणारे ८ अपघात घडले असून त्यात १७ जण किरकोळ जखमी झाले आहेत. किरकोळ जखमी अपघातांच्या संख्येत ६० टक्के घट झाली असून किरकोळ जखमीच्या संख्येत ५८ टक्के घट झाली आहे.तर ३ अपघातात कोणीही जखमी झालेले नाही. असे एकूण ८३अपघात घडले आहेत. कोणीही जखमी न होणाऱ्या अपघाताच्या संख्येत ६३ टक्के घट झाली आहे. तर एकूण अपघाताच्या संख्येत १९ टक्के घट झाली आहे.

## संपादकीय ......

# तरुणाई अडकतेय सापळ्यात...

तेजीत असलेला शेअर बाजार आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था या दाव्यांमध्ये भारतीय तरुण सोनेरी स्वप्नांच्या आशेने जगभर फिरत आहेत, हे काळे सत्य आहे. त्याहूनही दु:खद बाब म्हणजे ते मध्यस्थ, दलाल आणि गुन्हेगारांच्या कारस्थानांमुळे मानवी तस्करी आणि सायबर गुन्ह्यांचे बळी ठरत आहेत. भारतातील हजारो तरुण दक्षिण पूर्व आशियाई देशांमध्ये अडकले आहेत आणि त्यांना सायबर गुन्हे करणार्या नोकरदारांच्या तावडीत बेकायदेशीर कृत्ये करण्यास भाग पाडले जात आहे. देशातील सायबर गुन्ह्यांमध्ये सामील असलेले हेच लोक संशयास्पद क्रिप्टोकरन्सी योजनांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी देश बांधवांना प्रलोभन देत आहेत, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे.

जानेवारी २०२२ ते मे २०२४ या कालावधीत कंबोडिया, थायलंड, म्यानमार आणि व्हिएतनाममध्ये व्हिजिटिंग व्हिसावर गेलेल्या ७३,००० भारतीयांपैकी ३०,००० अद्याप मायदेशी परतलेले नाहीत. या सायबर गुलामांपैकी निम्म्याहून अधिक २० ते ३९ वयोगटातील आहेत. या बेपत्ता तरुणांच्या राज्यनिहाय यादीत पंजाब अव्वल स्थानावर आहे, हे विशेष. यानंतर महाराष्ट्र आणि तामिळनाडूची आकडेवारी आहे. आपल्या मुलांना त्यांच्या आकांक्षेनुसार देशात रोजगार उपलब्ध करून देणे, हे आपल्या धोरणकर्त्यांचे कर्तव्य आहे. सुदैवाने भारतामध्ये जगातील सर्वात जास्त तरुण लोकसंख्या आहे; परंतु आपली व्यवस्था त्यांना अपेक्षेनुसार काम देऊ शकत नाही. त्याचबरोबर सायबर गुन्हे करणार्या टोळ्यांच्या तावडीत हे तरुण सहज सापडणे हेही आपल्या कायदा व सुव्यवस्था व गुप्तचर यंत्रणेचे अपयश आहे. अलीकडेच म्यानमारमधील सायबर गुन्हेगारांच्या तळातून काही भारतीय तरुणांची सुटका करण्यात आली. या षड्यंत्रावर मोठ्या प्रमाणावर कारवाई होण्याची गरज आहे.

खरे तर भारतीय तरुणांची बेकायदेशीरपणे भरती करणारे एजंट अतिशय हुशारीने तरुणांना अडकवतात. भारतीय कुशल तरुणांना डेटा एन्ट्री आणि कॉल सेंटर ऑपरेटर पदांसाठी आकर्षक पगार दिला जातो. हे तरुण टुरिस्ट किंवा अन्य व्हिसाच्या माध्यमातून निर्धारित स्थळी पोहोचले की, त्यांचे पासपोर्ट हिसकावले जातात. परिणामी, दहशत, भीती आणि असुरक्षिततेत राहून काम करणे त्यांच्यासाठी मजबुरी बनते. त्यांना त्यांच्या मालकांना हवी असलेली बेकायदेशीर कामे करावी लागतात. या प्रकरणांवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्र सरकारने स्थापन केलेल्या आंतर-मंत्रालयीन पॅनेलने बँकिंग, इमिग्रेशन आणि दूरसंचार क्षेत्रातील त्रुटी ओळखल्या आहेत. या धोक्याचा मुकाबला करण्यासाठी आंतरविभागीय सहकार्य आणि समन्वय ही काळाची गरज आहे. सायबर गुन्हे आणि अशा फसवणुकीला आळा घालण्यासाठी केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाने दोन कोटी अवैध मोबाईल फोन कनेक्शन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्यक्षात हे मोबाईल कनेक्शन बनावट कागदपत्रांच्या आधारे खरेदी करण्यात आले होते. याचा सायबर गुन्हे करण्यासाठी गैरवापर केला जात होता. सायबर घोटाळेबाजांचा धाडसीपणा इतका वाढला की, प्रसिद्ध उद्योगपती एस. पी. ओसवाल यांची ७ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात ते यशस्वी झाले. अशा स्थितीत गुन्हेगारी नियंत्रण हे आपले प्राधान्य असले पाहिजे; पण त्यासोबतच या नेटवर्कच्या मुळापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न व्हायला हवा, जेणेकरून सायबर गुन्हेगार निरपराध लोकांना आपल्या जाळ्यात अडकवू शकणार नाहीत.

येथे एक प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे की, जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ही भारताची बिरुदावली असताना, मग आपल्या तरुण प्रतिभावंतांना, प्रज्ञावंतांना इतर विकसनशील देशांमध्ये काम करण्यास का भाग पाडले जात आहे? हे आपल्या मजबूत अर्थव्यवस्थेच्या प्रतिमेच्या विरुद्ध आहे. सध्या जर आपण आपल्या देशातील कुशल तरुणांना त्यांच्या गरजा आणि आकांक्षेनुसार नोकर्या देण्यात अपयशी ठरलो, तर विकसित भारताचे ध्येय दूरचे स्वप्नच राहील.

# घटस्थापना आणि घट उत्थापन याचा शास्त्रोक्त विधी जाणून घ्या!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती-** आश्विन शुद्ध प्रतिपदेला नवरात्र सुरू होते. यंदा ३ ऑक्टोबर रोजी नवरात्रीस प्रारंभ होत आहे. नवरात्रीनिमित्त अनेक घरात घटस्थापना करण्याचा कुळाचार आहे. अनेक जणींना घटस्थापना करण्याची इच्छा असते, परंतु शास्त्रशुद्ध पद्धत माहित नसते. चला तर जाणून घेऊया घटस्थापनेचा आणि नवरात्री उत्थापनाचा शास्त्रशुद्ध विधी!






**घटस्थापना विधी :** घट बसतेवेळी देवीची पूजा करावी. पूजा केलेला टाक घ्यावा. अभिषेक करावा नंतर स्थापना करावी. स्थापना करण्यापूर्वी प्रथम पाट घ्यावा. त्यावर गहू पसरून पाण्याने भरलेला कलश ठेवावा. पाण्यात पैसे, सुपारी घालावी. तांब्यावर गव्हाने भरलेले लहान ताम्हन ठेवावे. त्यात देवीचा टाक ठेवावा.

हळद-कुंकू गंध, फुल यांनी पूजा करावी. या दिवशी गव्हाचे महत्त्व जास्त असते. पाटापुढे शंख, घंटा ठेवावी. खाली पत्रावळ ठेवून पत्रावळीवर चाळलेली काळी माती टाकून गहू, पुन्हा माती, पुन्हा गहू पेरावेत. असे दोन तीन वेळा करावे. मध्ये पेल्यासारखे भांडे ठेवून त्यांची पूजा करावी.

यात पाणी, हळद, कुंकू वाहून फुलांची माळ करून त्यावर सोडावी. कलशाची पूजा करावी. पाटावर रांगोळी काढावी. कारळ्याच्या फुलांची किंवा झेंडुच्या फुलांची माळ करावी. ही फुले मिळाली नाहीत, तर अन्य कोणत्याही सुवासिक फुलांची माळ नवरात्रीत नऊ दिवस घटावर रोज एक याप्रमाणे बांधावी.

शक्य झाल्यास नवरात्रीत नऊ दिवस चोवीस तास समई तेवत ठेवावी. ज्या दिवशी एका तिथीचा क्षय असेल त्या दिवशी दोन वेळा माळा घालून नऊ दिवसांच्या माळा पूर्ण कराव्यात. रोज आपण फराळाचे जिन्नस करतो, त्यांचा नैवेद्य दाखवून नंतर फराळ करावा. रोज सायंकाळी देवीची आरती, जप, पोथीवाचन करावे.

**नवरात्र उत्थापन विधी :** रावणाशी युद्ध करण्यापूर्वी त्यात यश मिळावे म्हणून श्रीरामांनीदेखील नवरात्र व्रत केले होते. रावणवध दशमीला म्हणजे दसऱ्याच्या दिवशी केला. म्हणून काहीजणांकडे नवरात्र दसऱ्याच्या दिवशी उठवण्यात येते. तर काही जणांकडे दसऱ्याच्या आदल्या दिवशी म्हणजे नवमीला सायंकाळनंतर उठवण्यात येते.

नवरात्र उठते वेळी प्रथम देवीची पूजा करून घटाला माळ घालून करावी. नंतर माळ वर खुंटीवर ठेवावी. टाक ताम्हनात घेऊन अभिषेक करावा. धुवून पुसून देवघरात स्थापना करावी व पूजा करावी.

जेवणाचा नैवेद्य दाखवून, पुरणाचे दिवे तयार करून पुरणाची आरती करावी. पुरणाचे दिवे नऊ, पाच, सात असे करावेत सर्व दिवे लहान करावेत एक दिवा मोठा करावा. सर्व दिव्यात तूप आणि वात घालावी, मोठ्या दिव्यात हाताने केलेल्या दोरीच्या पाच वातीचा एक जुडगा लावावा.

पुरणाची आरती करावी. कलशातील पाणी घराच्या चारही दिशांना शिंपडून घ्यावे आणि बाकीचे तुळशीत ओतावे. दाराला आंब्याचे तोरण लावावे. दूध साखरेचा नैवेद्य दाखवून नवरात्रीचे उत्थापन करावे.

**जगदंब उदयोस्तु...!**

# कापूस पिकात गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी कसे कराल जैविक उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**

काही शेतकऱ्यांच्या वेळेवर लागवड झालेल्या कपाशीला फुले, बोंडे लागली असून त्यावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

सद्या वातावरण ढगाळ असल्याने व कापसाला पाते, फुले व काही प्रमाणात बोंडे लागत असल्याने गुलाबी बोंडअळीचे पतंग सक्रीय झालेले आढळून येत आहे.

मादी पतंग पाते, फुले, बोंडे यावर अंडी घालतात, तसेच यावर्षी कपाशी पिकाची लागवड एकाच वेळी न होता टप्याटप्याने झालेली आहे, त्यामुळे किडीला सतत खाद्य उपलब्ध होत असल्याने गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.

म्हणून कपाशीच्या पिकात कामगंध सापळे लावण्याची ही योग्य वेळ आहे जेणेकरून होणारा प्रादुर्भाव आतापासूनच निरीक्षणाद्वारे कमी करता येईल आणि पुढे होणारे नुकसान कमी करता येईल.

कृषी विशेष



**उपाययोजना**

१) कपाशीच्या पिकात नियमित सर्वेक्षण करुन डोमकळ्या दिसून आल्यास त्या आतील अळीसह तोडून जमा करून जाळून अथवा जमिनीत पुरून नष्ट कराव्यात.

२) गुलाबी बोंडअळीसाठीचे कामगंध सापळे हेक्टरी ५ या प्रमाणात पिकाच्या उंचीच्या एक ते दीड फूट उंच लावावीत.

३) मोठ्या प्रमाणात पतंग जमा करून नष्ट करण्यासाठी एका एकर क्षेत्रामध्ये गुलाबी बोंडअळीचे ८ ते १० कामगंध सापळे लावावेत.

४) ट्रायकोग्रामा बॅक्ट्री या परोपजीवी गांधीलमाशी ने परोपजीवीग्रस्त झालेले ट्रायकोकार्ड प्रति एकरी २-३ (६०,००० अंडी) या प्रमाणात पीक ६० दिवसांचे झाल्यावर दोन वेळा लावावे.

५) ट्रायकोकार्ड शेतामध्ये लावल्यानंतर कमीत कमी १० दिवसापर्यंत रासायनिक कीटकनाशकाची फवारणी टाळावी. कपाशीचे शेतात पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी किमान २५ पक्षी थांबे लावावेत, म्हणजे पक्षी त्यावर बसून शेतातील अळ्या खाऊन नष्ट करतील. पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अॅझाडिरेक्टीन १५०० पीपीएम ५०० मिली किंवा बिव्हेरिया बॅसियाना या बुरशीयुक्त जैविक कीटकनाशकाची जमिनीत ओल व हवेत आर्द्रता असताना ८०० ग्रॅम प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी.




## मेटॅबॉलिझम! शरीर नेहमी स्फूर्तिदायक राहण्यासाठी 'या' गोष्टी लक्षात ठेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**

मेटॅबॉलिझम म्हणजे 'चयापचय' हे उत्तम असणे आरोग्याचे लक्षण मानले जाते. आपला बेसल मेटॅबॉलिक रेट म्हणजे बीएमआर अनेक घटकांवर अवलंबून असतो. मात्र, काही गोष्टींची काळजी घेतली, तर हा रेट नक्कीच सुधारता येऊ शकतो. मेटॅबॉलिझम ही एक अशी क्रिया आहे, ज्यामध्ये आपल्या शरीराद्वारे खाल्लेले अन्न आणि पेय ऊर्जेमध्ये रूपांतरित होते. अशा परिस्थितीत आपले चयापचय हळू झाले तर शरीरातील ऊर्जा आपोआप कमी होईल. म्हणूनच आपल्याला माहिती पाहिजे की, आपला बेसल मेटॅबॉलिक रेट बीएमआर ठरवण्यासाठी कोणकोणते घटक महत्त्वाचे असतात. हे घटक जाणून घेतले, तर हा रेट योग्य राखणे शक्य होऊ शकते.

शरीराचा आकार म्हणजे बॉडी साईज उंच-धिप्पाड लोकांचे शरीर अधिक कॅलरीज जाळतात. तसेच ज्यांचे मसल्स जास्त असतात त्यांचेही असेच होते. एकाच वयाच्या स्त्री आणि पुरुषांमध्ये शरीरातील चरबीचे प्रमाण भिन्न असते. पुरुषांमध्ये फॅट्स कमी असतात त्यामुळे ते जास्त कॅलरी जाळतात. वय वाढते तसतसे स्नायूंचे आकारमान कमी होऊ लागते आणि कॅलरी जाळण्याची कृती मंदावते. अन्नावर होणारी प्रक्रिया महत्त्वाची असते. उदा. डायजेस्टींग, अॅब्जार्व्हिंग, ट्रान्सपोर्टिंग आणि स्टोअरिंग यामध्ये अन्नाचा व्यवस्थित वापर झाला तर कॅलरीजदेखील जळतात. त्यामुळे शरीराची पुरेशी हालचाल आवश्यक असते. व्यायाम आणि इतर कामादरम्यान बर्याच कॅलरीज जळतात.

बीएमआर वाढवण्यासाठी काही गोष्टी आपण नक्कीच करू शकतो. सकाळी उठल्यानंतर नाश्ता जरूर करावा. तो नाही केला तर चयापचय मंदावते. दिवसा लवकर खाण्याचा प्रयत्न करावा. अधिक काळ उपाशी राहू नये. ब्रेकफास्ट आणि दुपारचे जेवण वेळेत




केले तर आपले वजन नियमित राहते. झोपण्यापूर्वी दोन तास आधी जेवण करावे. बाराशेपेक्षा कमी कॅलरीजचा वापर केल्यास चयापचय कमी होतो. आहारात फळे आणि भाज्यांचा अधिक समावेश करावा.

तसेच कार्बोहायड्रेट्स जास्त घेऊन फॅट असणारे पदार्थ कमी खावेत. नियमित व्यायाम करावा. दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यानंतर दहा ते पंधरा मिनिटे जरूर चालावे. यामुळे चयापचय सुधारते. लिफ्ट ऐवजी पायर्यांचा वापर करावा. ऑफिसपासून थोड्या अंतरावर गाडी पार्क करावी, यामुळे थोडे चालणे होईल. अल्कोहोल घेणे टाळावे. याऐवजी भरपूर पाणी प्यावे.

अल्कोहोलमुळे चयापचय मंदावते. तसेच कुठलीही समस्या असेल, तर त्यावर वारंवार गोळ्या घेणे टाळावे. या गोष्टी लक्षात ठेवल्या तर मेटॅबॉलिझम सहज वाढू शकते. मेटॅबॉलिझम वाढले म्हणजे शरीर नेहमी स्फूर्तिदायक राहते.

# तळेगाव ठाकुर मध्ये मस्करी(हाडपक) गणरायाला भावपूर्ण निरोप

## मिरवणूक दरम्यान शेतकरी पंढरपूरी बैलबंडी व दिंडी विशेष आकर्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२तिवसा-** तळेगाव ठाकुर मध्ये अभदपूर्व सुरक्षा व्यवस्थे च्या वातावरणात हजारो भक्ताच्या लाडक्या मस्करी(हाडपक) गणरायाला मंगळवारी निरोप देण्यात आला.गणपती बाप्पा मोरया,पुढच्या वर्षी लवकर या असी आर्त विनवणी गणेश भक्तांकडून आपल्या लाडक्या गणरायाला केली जात होती.विशेष म्हणजे डीजे च्या वापरला पोलिसांनी नियमावली लावली असल्याने तळेगाव ठाकुर मधील ओम गणेश मंडळा ने पारंपरिक पद्धतीचा वापर करून या मिरवणूक दरम्यान शेतकऱ्याची पंढरपूरी बैलजोडी,बंडी मध्ये



मस्करी(हाडपक) गणरायाला बसवण्यात आले होते.गणरायाच्या मिरवणूक मध्ये दिंडी चे विशेष आकर्षण होते.या मिरुवनिक दरम्यान लहान मुलांना शंकर,पार्वती चे पात्र देण्यात आले होते.पारंपरिक पद्धत पाहून तळेगाव ठाकुर मधील नागरिक भारावून गेले होते.

# शेतकऱ्यांना दिलासा! अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार भरपाई

## थेट खात्यात होणार रक्कम जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती-** राज्य सरकारने निवडणुकांच्या तोंडावर शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेण्याचा तडाखा लावला आहे. यामध्ये अनुदान वाटप, नुकसान भरपाई वाटप आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी, प्रचार-प्रसिद्धीसाठी निधींची तरतूद करण्यात येत आहेत. तर यावर्षीच्या जुले व ऑगस्ट या दोन महिन्यात मुसळधार पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता शासनाने निधी मंजूर केला आहे.




दरम्यान, यंदा मान्सूनच्या पावसाने दमदारपणे हजेरी लावली पण जुलै आणि ऑगस्ट महिन्यात मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये खरिपातील पिकांचे आणि भाजीपाला पिकांचे नुकसान झाले होते. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने १३८ कोटी ५५ लाख ४८ हजार रूपयांचे वितरण करण्यास मंजुरी दिली आहे. जिरायत पिके, बागायत पिके व बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी मदतीच्या तीन हेक्टरच्या मर्यादेत या अनुदानाचे वाटप करण्यात येणार असून डीबीटी प्रणालीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होणार आहे. त्यामुळे यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना थेट मदतीचा लाभ मिळणार आहे. ही मदत कोणत्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी, कोणत्या पिकांच्या नुकसानीसाठी आणि किती शेतकऱ्यांना मिळणार याची अधिकृत माहिती अद्याप समोर आली नाही. पण निवडणुकांच्या तोंडावर आणि दिवाळीच्या आधी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार असल्याने दिलासा मिळणार आहे.

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण




## ३ ते १२ ऑक्टोंबर पर्यंत राहणार बंदी

## उद्या पासून शहरातील १० मार्गावर जड वाहनांना राहणार बंदी

### पार्कींगचे स्थान निश्चित, पर्यायी मार्गांचा होणार वापर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** आणि अंबादेवीआगामी नवरात्री महोत्सवा दरम्यान शहरात अपघात होऊ नये किंवा कायदा व सुव्यथेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी एक अधिसुचना काढून शहरातील १० मार्गावर ३ ते १२ ऑक्टोंबर पर्यंत जड वाहनांना बंदी केली आहे. तसेच अंबादेवी, एकविरा देवीसह मोठया मंडळांजवळ पार्कीगचे स्थान निश्चित केले आहे.







पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी पोलिस आयुक्तालयातील सभागृहात नवरात्री दरम्यान शहरात बंदोबस्त व वाहतुक व्यवस्थे बाबत आयुक्तालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीमध्ये नवरात्री दरम्यान एकविरा देवी, अंबादेवी मंदिर परिसरात, राजकमल चौक, गांधी चौक,चुनाभट्टी रोड, अंबागेट मार्गाव्रील यात्रेत होणारी भाविकांची गर्दी पाहता सुरक्षिततेच्या खबरदारीने उपाययोजना म्हणून ३ ऑक्टोंबरच्या मध्यरात्रीपासून ते १२ ऑक्टोंबरच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत मंदिर परिसर, यात्रा मार्ग आणि मुख्य रस्त्यावर वाहतुक नियंत्रणा करिता सुचना दिल्या. नवरात्री काळात राजकमल चौक ते अंबागेट, साबनपुरा ते गांधी चौक, ओसवाल भवन ते गांधी चौक, डॉ. धवड यांच्या दवाखाना ते गांधी चौक, मुख्य पोस्ट ऑफीस रोड ते पंचशिल लॉन्ड्री ते गांधी चौक पर्यंत, भुतेश्वर चौक ते गांधी चौक पर्यंत, नमुनाकडून अंबादेवी देवस्थानकडे

जाणारे सर्व लहान रस्ते बंद राहील, सक्कारसाथ ते भाजीबाजार जैन मंदिरापर्यंत, अंबागेट ते औरंगपुरा मार्ग, अंबादेवी मंदिराकडे जाणारा मार्ग, टांगापडाव ते साबपुरा पोलिस चौकी ते प्रभात चौक या मार्गांवर जड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या जड वाहनांना पर्यायी मार्ग सुध्दा उपलब्ध करून देण्यात आले आहे. मालवाहु, जड व हलकी, गिट्टी बोल्डर वाहने जुनी वस्ती बडनेरा टी-पाईन्ट येथून जुना बायपास मार्गे एमआयडीसी, दस्तुर नगर चौक, चपराशीपुरा चौक, बियाणी चौक येथून डावे वळण घेऊन गर्ल्स हायस्कुलचौक, इर्विनचौक, मालवियचौक, दिपक चौक मार्गांचा अवलंब करतायेईल. एसटी बसेस बसस्थानक, राजकमल, गद्रे चौक मार्ग बडनेरा जात व येतात त्या बसेस वाहनांसाठी राजपेठ-इर्विन चौक या उड्डाणपुलावरून गर्ल्स हायस्कुल चौक, पोलिस पेट्रोल पंप, बस स्थानक किंवा जुनी वस्ती बडनेरा येथून उजवे वळण घेऊन जुना बायपास मार्गाने दस्तुनगर, चपराशीपुरा चौक, बसस्थानक या पर्यायी मार्गाचा अवलंब करितील. बसस्थानकातून नागपुरीगेट मार्ग बाहेरगावी जाणाऱ्या बस रेल्वे स्टेशन चौक, इर्विन चौक, चित्रा चौक मार्ग जातील व याच मार्गाने शहरात येऊन गर्ल्स हायस्कुल चौक मार्गे बसस्थानकात जातील. राजापेठ चौकाकडून शहरात येणाऱ्या हलके चारचाकी वाहन यांना राजकमल चौकात प्रवेशबंदी असल्याने वाहनधारकांनी राजापेठउड्डाणपुलाचा वापर करावा, असे अधिसुचनेमध्ये नमूद करण्यात ओल आहे.

### अशी आहे वाहनांसाठी पार्कंग व्यवस्था

नवरात्री काळात भाविकांच्या वाहनांसाठी नेहरू मैदान, ओसवाल भवन मैदान, मुधोळकरपेठ मैदान, ओसवाल भवन ते गद्रे चौका कडील रस्त्याचे एका बाजुस, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे वळणापासून ते साईनगर कडे जाणाऱ्या रस्त्याचे एकाबाजुस, साबनपुरा चौक ते जवाहर गेट कडी रस्त्याचे एका बाजुस पार्कीगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच नवरात्री काळात गांधी चौक येथील पार्किंग स्थळ बंद राहिल. अंबादेवी, एकविरा देवी या दोन्ही मंदिरा लगतच्या २०० मीटर परिसरात कोठेही वाहन पार्क करता येणार नाही.

## सफाई कंत्राटदाराचे कामबंद आंदोलन स्थगित

### प्रलंबित देयकांपैकी दोन देयके तातडीने अदा करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** गत आठ नऊ महिन्यांपासून सफाई कंत्राटदारांची देयके प्रलंबित असल्याने कंत्राटदारांनी एक ऑक्टोबरपासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला होता, आंदोलनाची गंभीरता व सणासुदीचे दिवस लक्षात घेता प्रशासनाने मंगळवारी (ता. एक) कंत्राटदारांची बैठक बोलावून सकारात्मक चर्चा केली. मनपाची आर्थिक स्थिती पाहता कंत्राटदारांची दोन देयके तत्काळ अदा करण्यात येतील, अशी भूमिका प्रशासनाने घेतली. प्रशासनाच्या या भूमिकेनंतर कंत्राटदारांनी कामबंद आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.



झोन क्रमांक एक व झोन पाच क्रमांकाचे कंत्राटदार श्री नागरिक सेवा संस्था आणि झोन क्रमांक दोन व चारचे कंत्राटदार गोविंदा संस्थेने मंगळवारी एक ऑक्टोबरपासून कामबंदआंदोलनाचा इशारा दिला होता. आठ महिन्यापासून दोन्ही कंत्राटदारांना देयके अदा न केल्याने त्यांना तारेवरची कसरत करावी लागत होती. अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. प्रशासनाला वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रशासनाने निर्णय न घेतल्याने कंत्राटदारांनी एक ऑक्टोबरपासून कामबंद आंदोलनाचा निर्णय घेतला. यासंदर्भात पत्र प्रशासनाला दिले असता प्रशासनाने कंत्राटदारांना बैठकीकरिता बोलावले. मंगळवारी दुपारी एक वाजता झालेल्या बैठकीमध्ये प्रशासनाने प्रलंबित देवकांपैकी दोन देयके तत्काळ देण्याची भूमिका घेतली. यावेळी कंत्राटदारांनी कमीत कमी चार देयके देण्यात यावी, अशी मागणी केली होती. मात्र मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता दोन देयके देण्यात येईल व त्यानंतर पुन्हा काही देयके देण्याचा प्रयत्न प्रशासनातर्फे करण्यात येईल, असा विश्वास मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दर्शविल्यानंतर कंत्राटदारानी कामबंद आंदोलन स्थगित केले.

## 'स्वच्छता ही सेवा पंधरवड्या' निमित्त विभागीय आयुक्तालयात

### टाकावू पासून कलाकृतींची निर्मिती प्रदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती,–** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती प्रित्यर्थ २ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण देशात 'स्वच्छ भारत दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने १७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर हा कालावधी 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा म्हणून विभागात सर्वत्र राबविण्यात आला असून स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रमही या कालावधीत घेण्यात आले. या विषयावर आधारित वेस्ट टु आर्ट म्हणजे टाकावू वस्तूपासून निर्माण केलेल्या विविध कलाकृती, शोभेच्या वस्तूंचे प्रदर्शन विभागीय आयुक्त कार्यालयात आज भरविण्यात आले. सहाय्यक आयुक्त श्यामकांत मस्के यांच्या हस्ते या प्रदर्शनचे उद्घाटन करण्यात आले. विभागीय आयुक्तालायातील सर्व शाखांचे अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते. या प्रदर्शनमध्ये आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फुतपणे सहभाग घेत त्यांच्याव्दारे पंधरवडाच्याच्या कालावधीत निर्माण केलेल्या विविध कलाकृती ठेवण्यात आल्या होत्या.कर्मचाऱ्यांनी निर्माण केलेल्या विविध कलाकृतींमध्ये टाकावू वस्तूपासून तयार केलेले घराच्या प्रवेशव्दारावरील तोरण, फ्लॉवर पॉट, पेन स्टॅन्ड, देवाचे मंदीर, फुलझाडांसाठी कुंड्या, वेस्ट नारळापासून तयार केलेल्या शोभेच्या वस्तू, कॅलेंडर, प्रधानमंत्री सौर मोफत वीज योजना/ हरित उर्जेचा वापर याबाबत जनजागृतीची कलाकृती तसेच स्वच्छतेचा संदेश अधोरेखित करणाऱ्या विविध सुंदर



कलाकृतींचा समावेश आहे. आज भरविण्यात आलेल्या प्रदर्शन व स्पर्धेच्या माध्यमातून स्वच्छता व टाकावू वस्तूपासून टिकावू वस्तू निर्मितीसंबंधीचे महत्व कळण्यासाठी उपक्रम घेण्यात आला आहे. तसेच या प्रदर्शनीच्या स्पर्धेतून उत्कृष्ठ कलाकृती निर्मात्यांना विजेता म्हणून घोषित करुन २ ऑक्टोबरला पारितोषिक वितरीत करण्यात येणार आहे. कापडी पिशव्यांच्या वापराबाबत व्यापक प्रमाणात जनजागृतीसाठी 'सेल्फी विथ थैला' ही संकल्पना सुध्दा राबविण्यात येणार, अशी माहिती सहाय्यक आयुक्त श्यामकांत मस्के यांनी यावेळी दिली.


## शहानूर धरणावरील भूकंपमापक यंत्रच नादुरुस्त ; प्रशासनाची उदासीनता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अंजनगाव सुर्जी –** जिल्ह्यातील सात तालुक्यासह काही गावांमध्ये सोमवारी दुपारी १ वाजून ३७ मिनीटांनी भूकंपाचे सौम्य झटके बसले. दोन सेकंदाच्या या भूकंपाच्या झटक्याने नागरिक हादरून गेले होते. सुदैवाने यात कोणतीही वित्त अथवा जिवितहानी झाली नाही. परंतु अशा मोठ्या नैसर्गिक संकटाची पूर्वसूचना मिळावी याकरीता लाखो रूपये खर्च करून तालुक्यातील शहानूर धरणावर भुकंप मापक यंत्र बसविण्यात आले परंतु सदरचे यंत्रच नादुरूस्त असल्याचे वास्तव समोर आल्याने भुकंपासारख्या संवेदनशील व त्याचे संबंधित महत्वाचे माहीती संकलित करणाऱ्या उपकरणा बाबतीत प्रशासनाची उदासिनता मात्र यानिमित्ताने उजागर झाली आहे.

सोमवारी जिल्ह्यातीलधारणी, चिलखदरा, अंजनगाव सूर्जी,

अचलपूर, तिवसा, दर्यापूर, भातकुली या तालुक्यासह काही गावांमध्ये भूकंपाचा सौम्य धक्का बसला. गाव-खेड्यातील ग्रामस्थ या सौम्य झटक्याने हादरून गेले होते. भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अंजनगांवसुर्जी तालुक्यात भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचा केंद्रबिंदू चिखलदरा तालुक्यातील खटकाली



असल्याची प्राथमिक माहिती असून काही सेकंदापर्यंत ४.२ रिश्टर स्केल इतक्या तिव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले व बरोबर आजच्याच दिवशी ३० सप्टेंबरला १९९३ सालच्या किल्लारी येथे भूकंप झाला होता. त्याच्या भयानक आठवणींना ऊजाळा मिळाला असताना तालुक्यातील भुकंपाचे मोजमाप करणारे शहानूर धरणावरील यंत्रणाच बंद असल्याचे समजते. सर्वसाधारणपणे जास्त जलसाठा असणाऱ्या धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील तज्ज्ञाच्या मार्गदर्शनुसार धरणे किंवा पाणी रोखून

ठेवण्यासारख्या ठिकाणी पाण्याचा अतिरिक्त दाब असतो. त्या अनुषंगाने परिसरात किंवा धरण ठिकाणी भूकंप होण्याची शक्यता असते. परिणामी अशा ठिकाणी भूकंप मोजणी यंत्रणा (सिस्मोग्राफ) कार्यान्वित केली जाते. शहानूर धरण परिसरात धरण निर्मितीनंतर भूकंप मोजणी यंत्रणा त्यावेळेस कार्यान्वित करण्यात आली होती. त्यात भूकंपाची तीव्रता व मोजमाप व्यवस्थेसह विविध यंत्रसामुग्री कार्यान्वित करण्यात आली होती. शहानूर धरण निर्मितीनंतरभूकंपासारख्या घटना जरी घडल्या नसल्या तरी दि.३० ला झालेल्या काही सेकंदाच्या भुकंपाचे धक्याबाबत शहानूर येथील यंत्रामध्ये कोणता डाटा नोंदविला गेला अशी माहीती संबंधित अधिकाऱ्यांन विचारणा केली असता. धरणावरीन भुकंपमापक यंत्रात बऱ्या दिवसापासून तांत्रिक बिघाड झाल्या बंद असल्याचे वास्तवर समोर आले.

## परतवाडा मार्गावर दुचाकींचा भिषण अपघात

### चिखलदऱ्याहून परतणाऱ्या युवतीसह युवकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** चिखलदऱ्याहून अमरावती ला येत असतांना विरुध्द दिशेने भरधाव येणाऱ्या होन्डा शाईन गाडीची दुचाकीला धडक बसल्याने युवतीसह एका युवकाचा घटनास्थळी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास परतवाडा मार्गावरील बाबुजी हॉटेलसमोर घडली. मृणाल ढगे (वय २० रा. मनोरमांगल्य जवळ) असे मृत मुलीचे नाव आहे. तर दुसऱ्या युवकाचे नाव अद्यापही समोर आले नाही.

मृणाल ढगे ही चार मित्र मैत्रीसह दुचाकीने चिखलदऱ्याला फिरायला गेले होते आणि मंगळवारी रात्रीला सर्व अमरावतीला परत येत असतांना कुंदन कदम व मृणाल जुपीटर दुचाकीवर (क्र. एम.एच. २७ डी.जे. ३०१९) होते. तर दुसऱ्या दुचाकीवर एक युवक आणि तीन मुली असे पाचही मैत्र मैत्रीणी अमरावतीच्या दिशेने येत असतांना विरुध्द दिशेने दोन युवक शाईन गाडी (एम.एच. २७ बी.सी. ९६४८) परतवाड्याच्या दिशेने भरधाव जात होता. दरम्यान बाबुजी हॉटेल समोर भरधाव शाईन गाडीची जुपीटरला धडक लागल्याने मृणालचा घटनास्थळी मृत्यू झाला. तर शाईन गाडी चालकाचासुध्दा मृत्यू झाला. तसेच कुंदन व अन्य एक युवक गंभीर जखमी झाले. स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिली. परंतु पोलीस पोहचण्या आधीच खाजगी ऑबुलन्सने मृत व जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. वलगाव पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून गुन्हा दाखल करीत अधिक तपास सुरू केला.

## सातनूर येथील मुलाचा विजेचा धक्का लागून दुर्देवी मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती –** सकाळी ९ वाजता शेतात चारा आणण्याकरीता गेलेला सातनूर येथील १७ वर्षीय सौरभ भाजीखाये या मुलाचा मंगळवारी (ता. एक) सकाळच्या सुमारास मृतदेह आढळून आल्याने खळबळ माजली आहे. ज्या परिसरामध्ये मृतदेह आढळून आला स तो परिसर मध्यप्रदेशातील मुलताई पोलिसांच्या हद्दीत आहे. मुलताई पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तपास सुरु केला आहे. सौरभचा मृत्यू शेतातील कंम्पाऊंड तारांना करंट लागुन झाल्याचे कळते.सातनुर सौरभ गणेश भाजीखाये हा रवाळा शेतशिवारातील शेतामध्ये बकऱ्याकरीता चारा आणण्यासाठी गेला होता. दुपार होऊनसुध्दा तो घरी परत न आल्याने त्याचासर्वत्र शोध घेण्यात आला परंतु तो कुठेही आढळून आला नाही, अखेर शेदुरजनाघाट पोलिसांत सौरभ हरविल्याबाबत तक्रार नोंदविण्यात आली. सोमवारी सायंकाळी खडकी शेतशिवारातील एका शेतात त्याच्या चपला आढळून आल्या तर तेथून ४०० ते ५०० मिटर अंतरावर मंगळवारी त्याचा मृतदेह राजा उईके यांच्या मौजा खडकी शेत शिवारात आढळून आला. यासंदर्भात शेंदुरजनाघाट पोलिसांना पाचारण करण्यात आले. ज्या ठिकाणी मृतदेह आढळला तो परिसर मध्यप्रदेशातील मुलताई पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने मुलताई पोलिसांना पाचारण करण्यात आले. मुलताई पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो उत्तरीय तपासणीकरीता रवाना केला. ज्या ठिकाणी सौरभच्या चपला आढळून आल्या ते शेत मध्यप्रदेशातील मौजा खडकी येथील असल्याचे समजते. सौरभला शेतातील कंम्पाऊंड तारांचा करंट लागून त्याचा मृत्यू झाल्याची तसेच आपल्यावर आपत्ती येऊ नये म्हणून शेतमालकानेच त्याचा मृतदेह ४०० ते ५०० मीटर दुर नेऊन टाकला असावा, अशी चर्चा सद्याः सुरु आहे. करंट लागून मृत्यू झाल्याचे मुलताई पोलिसांनी सांगितले असून पुढील तपास मुलताई पोलिस करीत आहेत.

# अनंत अंबानी उद्धव ठाकरेंच्या भेटीला

## ‘मातोश्री’वर २ तास बैठक, काय घडलं?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मुंबई** –देशातील प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतली आहे. जवळपास २ तास अनंत अंबानी आणि ठाकरे यांच्यात बैठक झाली. त्यानंतर रात्री उशिरा अनंत अंबानी यांचा ताफा मातोश्रीबाहेर निघाला. अंबानी आणि ठाकरे यांच्या बैठकीत नेमकी कशावर चर्चा झाली हे अद्याप समोर आले नाही. परंतु विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या भेटीने राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत.



उद्योग व्यवसायासह अनंत अंबानी हे प्राणीमित्र आहेत, प्राण्यांच्या देखभालीसाठी ते वनतारा नावाने ड्रीम प्रोजेक्टही चालवतात. विशेषत: हत्तींच्या संरक्षणासाठी अनंत अंबानी पुढाकार घेतात. गुजरातच्या जामनगर भागात रिलायन्स कॉम्पल्सेच्या जवळ ६०० एकरात वनतारा प्रकल्प अनंत अंबानींनी बनवला आहे. त्याठिकाणी जगभरातील अत्याधुनिक सुविधा देण्यात आल्यात. अंबानी कुटुंब हे व्यवसायात तर ठाकरे कुटुंब राजकारणात चर्चेत असते. या दोन्ही कुटुंबाचे सलोख्याचे संबंध आहेत. अनंत अंबानी यांच्या लग्न समारंभाच्या प्रत्येक कार्यक्रमात उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांची हजेरी होती. अनंत अंबानी यांच्या लग्नात तेजस ठाकरे यांनी डान्स केल्याचा व्हिडिओही सोशल मीडियात व्हायरल झाला होता. यावरून विरोधकांनीही ठाकरेंवर टीका केली होती.

नुकतेच हरियाणा विधानसभेच्या प्रचारात राहुल गांधी यांनी अनंत अंबानी यांच्या लग्नाच्या खर्चावरून भाजपाला टार्गेट केले होते. राहुल गांधी म्हणाले होते की, तुम्ही अंबानी कुटुंबातलं लग्न पाहिले का, अंबानींनी लग्नात कोट्यवधीचा खर्च केला हा पैसा कुणाचा आहे? हा पैसा तुमचा आहे. तुम्ही तुमच्या मुलांच्या लग्नासाठी बँकांकडून कर्ज घेता, परंतु नरेंद्र मोदींनी अशी योजना केलीय, ज्यातून निवडक २५ लोक लग्नात कोट्यवधीचा खर्च करू शकतात. परंतु एक शेतकरी कर्जात बुडून मुलांची लग्न लावतो. जितका पैसा पंतप्रधान मोदींनी अदानी आणि अंबानी यांना दिला तितकेच पैसे आम्ही देशातील गरीबांना देऊ असं त्यांनी म्हटलं होते.

# तलाठी लोंदे यांच्यासह दोघांना अटक

## ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या तलाठ्यासह खाजगी इसमाला येथील लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. तलाठी राजेश रामदासजी लोंदे (वय ५१ रा. पुसला ता. वरुड) आणि खाजगी इसम असलम शहा गुलामरसु शहा (वय ६६ रा. पुसला ता. वरुड) अशी अटकेतील दोघांची नावे आहेत.तक्रारदाराने ग्राम सावंगी येथील सामाईक शेतीची वाटणीपत्रानुसार वाटणी करून सातबारा वेगळा करण्याकरिता परवानगी मिळण्याबाबतचा अर्ज तलाठी लोंदे यांच्याकडे केला होता. लोंदे यांनी अर्जाचा अहवाल तहसिलदार वरुड यांना सादर करण्याकरिता ४० हजार रुपये लाचेची मागणी केली होती.



याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत विभागाला तक्रार दिली होती. त्यानुषंगाने १३ सप्टेंबरला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी पडताळणी केली आणि ठरल्या प्रमाणे सापळा रचला. परंतु तलाठी लोंदेच्या लक्षात येताच त्यांनी लाच स्वीकारली नाही. परंतु लाचेची मागणी केल्या प्रकरणात लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी तक्रारदाराच्या तक्रारीवरून दोन्ही आरोपीविरुध्द मंगळवारी शेंदुरजनाघाट ठाण्यात गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. सदरच्या कारवाईत पोलीस निरीक्षक योगेशकुमार दंदे पोलीस कर्मचारी रायपुरे, नितेश, आशिष, शैलेश, किटकुले, जनबंधु यांचा समावेश होता.

# रिलायन्स पीक विमा कंपनीचे लायसन्स रद्द करा

## युवक काँग्रेस ची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** – पिक विम्यासाठी सर्वेक्षण करणारे कर्मचारी शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन शेतकऱ्यांची लूट करीत असल्याचा आरोप करीत रिलायन्स पीक विमा कंपनीचे लायसन्स रद्द करावे, अशी मागणी युवक काँग्रेसतर्फे कृषि अधिकाऱ्यांकडे करण्यात आली.'रिलायन्स' कंपनीला शासनाने पीक विमा सर्वेक्षणाचे कंत्राट दिले आहे. कंपनीने सर्वेक्षणासाठी नेमलेल्या युवकांना आतापर्यंत कुठलाही पगार दिलेला नाही. संबंधित युवक गावोगावी फिरत असताना कुठला अपघात किंवा दुर्घटना झाली तर कुठलाही विमा किंवा अन्य सुविधा त्यांना पीक विमा कंपनीकडून देण्यात येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करून त्यांच्याकडून पैसे घेण्याची एक प्रकारची छुपी मुभा कंपनीने कर्मचाऱ्यांना दिलेली आहे, असा आरोप युवक काँग्रेसने केला.



शेतकऱ्यांच्या असंतोषामुळे कुठला गैरप्रकार घडला आणि एखाद्या गरजू युवकाला हकनाक बळी पडावे लागले तर याला पीक विमा कंपनी व कृषी विभाग जबाबदार असेल असा इशारा यावेळी युवक काँग्रेसतर्फे देण्यात आला. कृषी अधिकाऱ्यांशी युवक काँग्रेस च्या शिष्टमंडळाने चर्चा करताना कंपनीच्या जिल्हा प्रतिनिधीशी दूरध्वनीवरून संपर्क साधला तेव्हा त्यानेसुद्धा या युवकांना पगार दिला की नाही याबाबत उडवा उडवीची उत्तरे दिली. कंपन्या जिल्ह्यातील बेरोजगार युवकांच्या असहायते चा फायदा घेत त्यांना पगार न देता त्यांची पिळवणूक करीत आहे तसेच शेतकऱ्यांची लूट करण्यास सुद्धा प्रवृत्त करीत आहेत, असा आरोप यावेळेस युवक काँग्रेसने केला आणि हा प्रकार न थांबवल्यास युवक काँग्रेसतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला.पीक विमा कंपनीला ब्लॅक लिस्ट करून कंपनीचे लायसन्स रद्द करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून अमरावती शहर युवक काँग्रेस कामगार सेलचे अध्यक्ष सागर वानखडे यांनी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना केली. यावेळी औद्योगिक सेल जिल्हाध्यक्ष समीर जवंजाळ व अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख उपस्थित होते.

# उद्याला शहरात ४९२ मंडळांतर्फे दुर्गा देवींची होणार स्थापना

## ६५ मंडळांचे ठिकाणी गरबा उत्सव, १०२ ठिकाणी शारदा देवी होणार विराजमान

### १०३ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात १३५० पोलिसांचा बंदोबस्त, १ एसआरपीफ कंपनी, ५०० महिला, पुरूष होमगार्ड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती**

गणेशोत्सवाचा बंदोबस्त शांततेत पार पडल्यानंतर आता शहर पोलिसांसमोर मिशन दुर्गोत्सोव आहे. यासाठी सीपी नवीनचंद्र रेड्डी यांनी मंगळवारी आयुक्तालयाच्या सभागृहात इतर संबधीत विभागाची बैठक घेतली. शहरात एकूण ४९२ मंडळांतर्फे दुर्गा देवीची स्थापना होणार असून त्यापैकी १०२ मंडळांतर्फे शारदा देवीची स्थापना करण्यात येणार आहे. विशेषम्हणजे ६५ ठिकाणी गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी शहरात १०२ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात तब्बल १३५० पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार आहे. एक एसआरपीएफची कंपनीसह ५०० महिला, पुरूष होमगार्ड देखील पोलिसांच्या मदतीला राहणार आहे.पोलिस आयुक्तालयातील सभागृहात झालेल्या बैठकीमध्ये मनपा, अग्निशमण विभाग, बाजारपरवाना विभाग, महावितरण, निवासी वैद्यकीय अधिकारी, आरटीओ, अन्न व औषधी प्रशान विभागाचे वरिष्ठ अधिकारी हजर होते. तसेच अंबादेवी, एकविरा देवी संस्थानच्या अध्यक्षांसह शहरातील सार्वजनीक मंडळाचे व गरबा नृत्य मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते देखील उपस्थित होते. बैठकीमध्ये सुरूवातीला दुर्गोत्सोव काळात रस्त्यांवरील झाडांच्या फाद्या छाटणे, विद्युत वाय, केबल,



स्ट्रिट लाईट दुरूस्त करणे, रस्त्यावर मंडप नटाकणे, मंडपाचा आकार मर्यादीतठेवणे, मुर्तीव मंडपाच्या सुरक्षेसाठी स्वयंसेवक नेमणे, गरबा कार्यक्रमाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, मिरवणूकीची व्हिडीओग्राफी करणे, आक्षेपार्ह गाणेन वाजविणे, अशा अनेक मुद्यांबाबत सीपींनी उपस्थितांना सुचना केल्या. त्याच प्रमाणे उपस्थित सर्व ठाणेदारांना आपआपल्या ठाण्याच्या हद्दीतील सराईत व हिट्रीशीटर गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाईच्या सुचना दिल्या.



नवरात्री दरम्यान शहरात लागणाऱ्या बंदोबस्ताचा आढावा देखील सीपींनी बैठकीत घेतला. शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत ३ डीसीपी, ५ एसीपी, २५ पोलिस निरिक्षक, ७० एपीआय/पीएसआय अशाएकूण १०३ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात तब्बल १३५० पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. तसेच आरसीपी, क्यूआरटी, राज्य राखीव दलाची एक कंपनी, ५०० महिला, पुरूषहोमगार्ड सुध्दा पोलिसांच्या दिमतीला राहणार आहे. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत महत्वाच्या – चौकात, गर्दीचे ठिकाण, संवेदनशील ठिकाणी फिक्स पाईन्ट नेमण्यात – येणार आहे. याशिवाय नियंत्रण कक्षाच्या १२ सीआर व्हॅन, ६ दामिनी, बीट मार्शन, डायल ११२ च्या वाहनांची सतत गस्त राहणार असल्याचे सीपी रेड्डी यांनी स्पष्ट केले.

# आजपासून कार्तिक मास शुभारंभ श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथे अखंड भजन व प्रवचन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२चांदुर रेल्वे–** अमरावती जिल्हयात चांदूर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे २ ऑक्टोबर रोजी दुपारी ५ वाजता संस्थानच्या छोट्या मंदिरात ढाल स्थापित करून कार्तिक मासची सुरूवात करण्यात येणार आहे.अमावस्या कार्यक्रमानिमित्त रात्री ८ ते १० वाजता दरम्यान अवधूत नाम प्रबोधनकार रेखा सूरकर (तळेगाव टालाटूली) यांचा प्रबोधनपर कार्यक्रम होणार आहे. कार्तिक मास मध्ये प्रतिदिनी बाहेर गावावरून अवधूत भजन मंडळ पोहचणार आहे. अखंड भजन मांड मध्ये सहभागी होणारे भजन मंडळी करीता अवधूत संस्थानच्या वतीने २ ते १५ ऑक्टोबर दरम्यान कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यात आलेली आहे.



अखंड भजन मांड मध्ये सहभागी होणारे भजन मंडळींचा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. भाविकांकरिता महाप्रसाद कार्यक्रम संस्थानचे अन्नदान समितीच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन पुंजाराम नेमाडे, कृपासागर राऊत, अशोक सोनवाल, विनायक पाटील, वामण रामटेके, गोविद राठोड, दिगांबर राठोड, अनिल बेलसरे, फुलसिग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी यांनी केले आहे.

# अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या अध्यक्षपदाचा आनंदराव अडसूळ यांनी पदभार स्वीकारला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती –** माजी खासदार आनंदराव अडसूळ यांची महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अडसूळ यांनी अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे.अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या उपाध्यक्षपदी धर्मपाल मेश्राम यांची नियुक्ती तर गोरक्षक लोखंडे आणि वैदेही वाढाण यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आयोगाचे उपाध्यक्ष आणि सदस्यांनीही आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे, अशी माहिती, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाने कळविले आहे. मुंबई येथील महाराष्ट्र राज्य जाती-जमातीआयोगाच्या कार्यालयात



आनंदराव अडसूळ यांनी अध्यक्षपदाचा पदभार स्विकारला. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी आनंदराव अडसूळ यांनी आयोगाचे सदस्य व अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत माहिती जाणून घेतली. तसेच काही दिशानिर्देश देखील दिले.

# शेतकरी आंदोलन, शिवाजी महाराज पुतळा प्रकरण

## माजी खा. नवनित राणा, कार्यकर्त्यांची कोर्टात हजेरी

### संबंधित सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे बयान नोंदविले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–**

शेतकरी शेतमजुरांच्या न्याय मागण्यासाठी केलेले आंदोलन तसेच राजापेठ उड्डाणपुलावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा स्थापन करण्याच्या खटल्यात माजी खा. नवनित राणा आणि युवा स्वाभिमानी कार्यकर्त्यांनी मंगळवारला हजेरी लावली. यावेळी नवनित राणांसह सर्व स्वाभिमानी कार्यकर्त्यांचे बयाण नोंदविण्यात आले.माजी खा. नवनीत रवी राणा यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी भव्य आंदोलन करण्यात आले होते, तसेच राजापेठ उड्डाणपुलावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा स्थापित करण्यात आला होता. या संदर्भात न्यायमूर्ती श्रीमती चांडक मॅडम यांच्या न्यायालयात खटला सुरू आहे.



यामध्ये आ. रवी राणा यांच्यासह सर्व आंदोलकांनी न्यायालयात उपस्थित राहून आपले बयान नोंदविले. या खटल्याची सुनावणी १ ऑक्टोबर रोजी झाली आहे.यावेळी मा. खा. नवनीत राणा यांच्या समवेतजितू दूधाने, पराग चिमोटे, बाळू इंगोले, संदीप गुल्हाने, साक्षी उमक, सुरज मिश्रा, सचिन भेंडे, अभिजीत देशमुख, अविकाळे, अनुप अग्रवाल, अजय बोबडे, अजय मोरया, जयश्री मोरया, अश्विन उके, विनोद गुहे, उपस्थित होते. यावेळी ॲड दीप मिश्रा, ॲड चंद्रसेन गुळसुंदरे यांनी बाजू मांडली.

# आधारभूत किंमतीवर शासकीय खरेदीसाठी मुंग, उडीद, सोयाबीन ऑनलाईन नोंदणी सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–**आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत शासकीय मुंग, उडीद, सोयाबीन चे ऑनलाईन नोंदणीचा शासनाकडून मंगळवार १ ऑक्टोंबर २०२४ पासून सुरुवात झाली आहे. शासनाचेहमीभाव मुंग-८६८२ रु. प्रतीक्विंटल, उडीद -७४०० रु. प्रतीक्विंटल, सोयाबीन-४८९२ रु. प्रती क्विंटल एवढे आहेत. ऑनलाईन नोंदणीकरीता १. अद्यावत ७/१२ सन २०२४-२५ ऑनलाईनपिकपेरा असलेला. २. आधार कार्ड झेरॉक्स ३. बँक पासबुक कउ सहीत ४. नोंदणी अर्ज शासनाने ठरवुन दिलेल्या निकषानुसार आदी कागदपत्रे लागणार आहेत.

फक्त एफ.ए.क्यु दर्जाचा माल खरेदी करण्यात येईल. तरी अमरावती तालुक्यातील मुंग, उडीद, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी अमरावती सहकारी शेतकी खरेदी विक्री समीती संस्थेचे कार्यालय – शेतकरी सदन, चित्रा चौक, अमरावती येथे सकाळी ११ ते ५ या कार्यालयीन वेळेत नोंदणीकरावी. अमरावती, धामणगाव रेल्वे, चांदुर बाजार, मोर्शी, वरुड, अंजनगाव सुर्जी, भातकुली, गणेशपूर (दर्यापूर), कापूसतळणी (अंजनगाव सुर्जी), येवदा या १० ठिकाणी व्हीसीएम कडे तर महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन कडे दर्यापूर, अचलपूर, तिवसा, चांदुर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील खरेदी राहणार आहे.

# पुण्यात हेलिकॉप्टर कोसळून तिघांचा मृत्यू
## बावधनमधील रिसॉर्टवरुन केलं होतं उड्डाण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२पुणे १**

पुण्यात पुन्हा एकदा हेलिकॉप्टरच्या अपघाताची घटना समोर आली आहे. पुण्याच्या बावधन बुद्रुक परिसरात हेलिकॉप्टर कोसळून तिघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हिंजवडी पोलिसांच्या कंट्रोल रुमला या घटनेची माहिती मिळाली. एका रिसॉर्टवरच्या हेलिपॅडवरुन उड्डाण केलेल्या हेलिकॉप्टरला हा अपघात झाला.

पुण्याच्या बावधन बुद्रुक परिसरातील ऑक्सफर्ड काऊंटी रिसॉर्टवरच्या हेलिपॅडवरुन उड्डाण केलेल्या हेलिकॉप्टरचा अपघात होऊन तिघांचा मृत्यू झाला. सकाळच्या सुमारास धुके असलेल्या डोंगराळ भागात हे हेलिकॉप्टर कोसळले. हा अपघात नेमका कशामुळे घडला याची माहिती समोर आलेली नाही. या हेलिकॉप्टरमध्ये तिघे होते आणि तिघांचाही मृत्यू झाला. या परिसरात एकमेक हेलिपॅड असल्यामुळे अनेक महत्त्वाच्या व्यक्ती तिथे येत असतात. घटनेची माहिती पोलिसांसह, अग्निशमन दल आणि बचाव पथक घटनास्थळी पोहोचलं आहे.

ऑक्सफर्ड काऊंटी रिसॉर्ट आणि एचईएमआरएल नावाच्या केंद्र सरकारच्या संस्थेच्या मधल्या डोंगराळ भागातील के के कन्स्ट्रक्शन टेकडी येथे हे हेलिकॉप्टर कोसळलं आहे. सकाळी साडेसातच्या सुमारास या हेलिकॉप्टरने उड्डाण घेतलं होतं. त्यानंतर काही अंतरावरच हेलिकॉप्टरचा अपघात झाला, अशी माहिती स्थानिक आमदार संग्राम थोपटे यांनी दिली.

अपघातानंतर हेलिकॉप्टरला आग लागल्याचे पोलिसांनी सांगितले. यामुळे तिन्ही मृतदेह गंभीररित्या जळाले. हेलिकॉप्टर सरकारी की खासगी हे अद्याप समजू शकलेले नाही. मृतांचीही ओळख पटू शकली नाही.दरम्यान, हेलिकॉप्टर अपघाताची ४० दिवसातील पुण्यातील दुसरी घटना आहे. याआधी २४ ऑगस्ट रोजी पुण्यातील पौड परिसरात हेलिकॉप्टर कोसळले होते. हे हेलिकॉप्टर मुंबईहून हैदराबादला जात होते. त्यात एक पायलट आणि तीन प्रवासी होते. या अपघातात पायलट जखमी झाला. उर्वरित तीन जणांना गंभीर दुखापत झाली नाही.

# दसऱ्याच्या पहाटे आकाशात 'धुमकेतू'ची दिवाळी; रमन विज्ञान केंद्रात विशेष व्यवस्था

## 'त्सुचिन्शन ॲटलास' जाईल पृथ्वीच्या जवळून : पूर्वेकडे उघड्या डोळ्यानी होईल दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

हजारो-लाखो धुमकेतू आपल्या अंतराळात फिरत असतात, पण त्यातील काही हानीकारक ठरणाऱ्या मोजक्याच धुमकेतूचे दर्शन घडू शकते. असाच एक धुमकेतू सूर्याभोवजी भ्रमंती करताना पृथ्वीजवळून जाणार आहे. दसऱ्याच्या दिवशी पहाटे पूर्वेकडच्या आकाशात 'त्सुचिन्शन ॲटलास' नामक या धुमकेतूचे उघड्या डोळ्यांनी दर्शन घडू शकेल.



रमन विज्ञान केंद्राचे खगोल शिक्षक महेंद्र वाघ यांनी सांगितले, काही धुमकेतू सूर्याभोवती वेगाने भ्रमंती करतात व ५० वर्षातून एकदा त्यांचे दर्शन घडते. मात्र काहींचे वेळापत्रक नसते व त्यांना एक भ्रमंती पूर्ण करायला २०० हून अधिक वर्षाचा कालावधी लागतो. 'त्सुचिन्शन ॲटलस' या धुमकेतूचा कार्यकाळ ८०,००० वर्षाचा असल्याचे बोलले जात आहे. सध्या हा धुमकेतू सूर्याच्या जवळ असल्याने त्यांचे स्पष्ट दर्शन होत नाही. लवकरच ऑक्टोबरमध्ये तो पृथ्वी आणि सूर्य यांच्यामधून जाईल व नंतर दृष्टीआड होईल. ऑक्टोबरमध्ये त्याला पाहण्याची संधी आहे. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी धूमकेतू पृथ्वीच्या सर्वात जवळ राहणार आहे. त्यामुळे पहाटेच्या वेळी पूर्वेकडे त्याचे दर्शन घडेल, अशी माहिती वाघ यांनी दिली.

चीनमधील पर्पल माउंटेन वेधशाळेने ९ जानेवारी २०२३ रोजी हा धुमकेतू शोधला होता. त्यानंतर २२ फेब्रुवारी रोजी ॲटलस रोबोटिक दुर्बिणीच्या मदतीने त्याची पुन्हा नोंद करण्यात आली. त्यामुळे या धुमकेतूला 'त्सुचिन्शन ॲटलस' असे नाव देण्यात आले आहे. धुमकेतू हे वायू व बर्फाळ पिंड असतात, जे सूर्याभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत फिरत असतात.

**रमन विज्ञान केंद्रात विशेष व्यवस्था**

सध्या आकाशात शनि आणि शुक्र ग्रहांचे दर्शन होत आहे. हे दोन्ही ग्रह पाहण्यासाठी रमन विज्ञान केंद्र व तारामंडळातर्फे ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात विशेष व्यवस्था केली जाणार आहे. यासोबतच 'त्सुचिन्शन ॲटलस' हा धुमकेतू पाहण्यासाठीही केंद्रातर्फे व्यवस्था करण्यात येईल.

# मंत्री छगन भुजबळ यांना अश्लील शिवीगाळ करणारे मेसेज आणि जीवे मारण्याची धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. छगन भुजबळ यांना एका अज्ञात व्यक्तीने जीवे मारण्याची धमकी दिली. त्याने मेसेज आणि फोन करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलिसांना माहिती देण्यात आली आहे. या धमकी प्रकरणी नाशिकमधील अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच त्यानंतर पोलिसांनी तातडीने अज्ञात आरोपीच्या शोधास सुरुवात केली. छगन भुजबळ यांना याआधीदेखील अनेकदा जीवे मारण्याची धमकी आली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी तपास करत धमकी देणाऱ्या आरोपीला शोधून काढलं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने छगन भुजबळ यांना मोबाईलवर मॅसेज करत अश्लील शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिली होती. यानंतर संबंधित घटनेची गंभीर दखल घेत या प्रकरणी नाशिक पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती. यानंतर अंबड पोलीस ठाण्यात धमकी देणाऱ्या आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांकडून आरोपीची ओळख पटली आहे. रवींद्र यशवंत धनक असं धमकी देणाऱ्या आरोपीचं नाव आहे.

# नितीन खंडारकर यांना सेवानिवृत्तीनिमित्त भावपूर्ण निरोप

## शासकीय सेवेत नेहमी सकारात्मक भूमिकेतून काम करावे -उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

शासकीय नोकरीत कार्यरत असताना प्रत्येकाच्या आयुष्यात सेवानिवृत्तीचा दिवस येत असतो. शासकीय सेवेत असताना पदाला सोपविलेली जबाबदारी सकारात्मक दृष्टिकोण ठेवून प्रामाणिकपणे पार पाडल्यास त्याची प्रशासनाकडून दखल घेतली जाते. तसेच संपूर्ण सेवाकाळ हा उत्तमरित्या पूर्ण होतो. माहिती व जनसंपर्क विभागात काम करणारे नितीन खंडारकर यांचाही हा गुणवैशिष्ट्य असून प्रत्येक कर्मचार्याने आपल्या पदाचे कर्तव्य सकारात्मक व प्रामाणिकपणे पार पाडावे, असे आवाहन उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर यांनी केले.

विभागीय माहिती कार्यालयातील साउंड रेकॉर्डीस्ट नितीन रामभाऊ खंडारकर हे दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेत. सेवानिवृत्ती कार्यक्रमानिमित्त आज उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर यांच्या हस्ते श्री. खंडारकर यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार, सहायक संचालक विजय राऊत यांच्यासह विभागीय माहिती कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

श्री. खंडारकर यांनी ३० वर्षे ७ महिने अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा बजावली असून टि.व्ही कॅमेरामन पदाचे काम विनातक्रार पार पाडले आहे. राज्यातील गडचिरोली ते कोल्हापूर जिल्ह्यापर्यंत अनेक महत्वपूर्ण शासकीय दौरा कार्यक्रमांचे त्यांनी उत्तमरित्या चित्रिकरण करुन वेळेत प्रसारमाध्यमांना उपलब्ध करुन दिले आहे. विविध महत्वपूर्ण विषयावर त्यांनी लघु चित्रपट तयार केले असून मुंबई मुख्यालयाने सुध्दा त्यांच्या कामाचा गौरव केला आहे. मेळघाट सारख्या दुर्गम भागातील चित्रीकरण त्यांनी उत्तमरित्या केले आहेत. त्यांनी सर्वांशी समन्वय व जिव्हाळा जपला असून सहकार्यांच्या अडचणीवेळी ते मदतीला धावले आहेत. दिर्घकाळ सेवेत त्यांनी पदाची जबाबदारी उत्तमरित्या सांभाळली आहे, अशी भावना कार्यालयातील सहकार्यांनी व्यक्त यावेळी केली.

प्रदर्शन सहाय्यक विश्वनाथ धुमाळ, वरिष्ठ लिपीक दिनेश धकाते, मनोज थोरात, सुनील काळे, श्रीमती वैशाली ठाकरे, कॅमेरा सहाय्यक मो. शेख हबीब, कुमार हरदुले, छायाचित्रकार मनीष झिमटे, सागर राणे, कनिष्ठ लिपीक कोमल भगत, जयप्रकाश बानाईत, वाहन चालक सुधीर पुनसे, साजीद शेख, संदेश वाहक गजानन पवार, कांचन अंधारे, दिपाली ढोमणे, राजश्री चौरपगार आदी यावेळी उपस्थित होते.

श्री खंडारकर यांच्या निरोप समारंभानिमित्त कार्यालयातील सहकार्यांनी मनोगत व्यक्त करुन त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. श्री. खंडारकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. श्री. धुमाळ यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार मानले.

# जंगल सफारीच्या पहिल्याच दिवशी वाघांची डरकाळी
## पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये पर्यटकांनी घेतला आनंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर ३**

पावसाळ्यानंतर १ ऑक्टोबरपासून नागपूर विभागातील सर्व अभयारण्यात सफारी सुरू केल्यानंतर मंगळवारी पहिल्याच दिवशी पर्यटकांनी जंगल सफारीचा मनमुराद आनंद लुटला. अतिवृष्टीची परिस्थिती लक्षात घेता पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या काही गेटवरून पर्यटन सुरू झाले आहे. पहिल्याच दिवशी सफारीसाठी पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. रामटेक तालुक्यातील सिल्लारी गेटकडून सफारीला गेलेल्या काही पर्यटकांना टी-६२ वाघीण व तिच्या तीन बछड्यांचे मनमोहक दर्शनही झाले.

अतिवृष्टीमुळे रस्त्याची परिस्थिती लक्षात घेता सद्य:स्थितीत पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या सिल्लारी गेट, खुर्सापार गेट, बनेरा गेट व चोरबाहुली गेटवरून सफारीसाठी परवानगी देण्यात आली आहे. सध्या जंगल सफारी करणाऱ्यांना १५ ऑक्टोंबरपर्यंत ऑफलाइन पद्धतीने बुकींग करावी लागणार आहे. १६ ऑक्टोबरनंतर ऑनलाईन बुकिंग सुरू होईल.

> १९७५ मध्ये व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळालेल्या सेलू तालुक्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाचा कोअर झोन ४३९.८४ कि.मी. तर बफर झोन २०५.०३ कि.मी. इतका आहे. या व्याघ्र प्रकल्पात सुमारे ५५ पेक्षा अधिक प्रौढ वाघांचे वास्तव्य आहे. या व्याघ्र प्रकल्पाचे कोअर क्षेत्र वाघ, बिबट, अस्वल आदी वन्य जीवांच्या संवर्धनासाठी उपयुक्त ठरत असून; पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातही वाघांची मुव्हमेंट असते.पेंच व्याघ्र प्रकल्पात मंगळवारपासून जंगल सफारी सुरू झाली. येथे पहिल्या दिवसापासूनच ऑनलाइन बुकींग सुरू झालेली आहे. पहिल्या दिवशी मोठ्या संख्येने पर्यटकांनी हजेरी लावली. सफारीकरीता आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
>
> **-विवेक राजुरकर, वनपरिक्षेत्र अधिकारी, पेंच व्याघ्र प्रकल्प, सिल्लारी.**

# नागपूर जिल्ह्यात कुटुंबाची सामूहिक आत्महत्या; पती-पत्नीसह दोन मुलांनी घेतला गळफास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नरखेड**

एकाच कुटुंबातील चौघांनी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना नागपूर जिल्ह्यातील मोवाड (ता. नरखेड) येथे बुधवारी घडली आहे.

विजय मधुकर पाचोरी (६२), माला विजय पाचोरी (५४), डिंकू विजय पाचोरी (४०) व गणेश विजय पाचोरी (३७) अशी मृतांची नावे आहेत. या सर्वांनी त्यांच्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना सकाळी ७:३० ला उघडकीस आली. मोवाड येथील वॉर्ड क्र ५ मधील खोब्रागडे यांच्या कडे पाचोरी कुटुंब भाड्याने राहत होते. सकाळी शेजाऱ्याना हा प्रकार लक्षात आला. घटनास्थळी नरखेड पोलीस दाखल झाले असून पुढील कारवाई करीत आहे. आत्महत्यांचे कारण अद्यापही समजले नाही . मृतकापैकी एक हा मध्यप्रदेशातील पांढूर्णा येथे आर्थिक घोटाळ्यातील आरोपी होता. काही दिवसांपूर्वीच तो जमीनावर बाहेर आला होता, अशी माहिती आहे.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी च्या ११ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२ अमरावती**

पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती द्वारा संचालित, पी.आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये नुकताच ऍडव्हान्टमेड इंडियाअहमदाबाद या मेडिकल कोडिंग क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपनी चा ओपन कॅम्पस ड्राईव्ह संपन्न झाला. या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये विविध फार्मसी महाविद्यालयातील पाचशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कंपनीचे सर्व राऊंड पार करत पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसीच्या अपूर्वा फसाटे,यश भावसार,राधेश्याम सोनार,अनुष्का पांडे,धनश्री भोरे, आकांक्षा जवादे,शुभम मापारी,शिवानी वाघ, वेद यावलीकर, आचल कोल्हे,गौरव कुरवाडे या एकूण ११ विद्यार्थ्यांची निवड झाली.सदर कार्यक्रमात ऍडव्हान्टमेंट इंडिया,अहमदाबाद यांच्यातर्फे सहाय्यक व्यवस्थापक श्री. हिरेन शहा व टीम यांनी मार्गदर्शन केले व त्यानंतर अनुक्रमे पात्रता चाचणी,वैयक्तिक मुलाखत व नंतर अंतिम फेरीत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.पी.आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी सोबतच अभियांत्रिकी व इतर सर्व शाखेंच्या विद्यार्थ्यांसाठी नियमित कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह चे आयोजन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा करण्यात येते व त्याचा लाभ विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात होतो.सदर कॅम्पस ड्राईव्ह मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीप्ती रुईकर व सर्व प्राध्यापकांनी कौतुक केले.



# सकाळी सहापासून आहे घटस्थापनेचा मुहूर्त

## स्थापनेसाठी वेगवेगळे तीन मुहूर्त : उद्या होणार मातेचे आगमन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आश्विन शुक्ल प्रतिपदेच्या दिवशी म्हणजे ३ ऑक्टोबर २०२४ रोजी गुरुवारी सकाळी ६ वाजतापासून घटस्थापनेसाठी वेगवेगळे तीन मुहूर्त यंदा आहे आहेत. मुहूर्ताच्या या वेळांमध्ये कोणत्याही घटस्थापना वेळी करून नवरात्रातील पूजन करता येणार आहे.



यावर्षी आश्विन शुक्ल तृतीया तिथीची वृद्धी झाल्याने नवरात्र दहादिवसांचे आले आहे. यामध्ये ७ ऑक्टोबर रोजी ललिता पंचमी असून, १० ऑक्टोबर रोजी महालक्ष्मी पूजन म्हणजेच घागरी फुंकणे आहे. ११ रोजी महाष्टमीचा व नवमी उपवास एकाच दिवशी असून, १२ ऑक्टोबर शनिवारी नवरात्रोत्थापन नवरात्र समाप्ती आणि दसरा आहे. नवरात्रीला आता काही तासांचाच अवधी उरला असल्याने मातेच्या आगमनासाठी सर्वत्र लगबग सुरू आहे.

**असे आहेत तीन वेगवेगळे मुहूर्त**

पंडित पंकज जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटस्थापनेसाठी गुरुवारी सकाळी ६ वाजतापासून ७:३० वाजेपर्यंत. त्यानंतर सकाळी १०:३० वाजेपासून दुपारी २:५६ वाजेपर्यंत तर सायंकाळी ४:३० वाजेपासून रात्री ८:५६ वाजेपर्यंत मुहूर्त आहेत.

**सीमोल्लंघनाचा विजय मुहूर्त कधी ?**

विजया दशमी, दसरा, सीमोल्लंघन हे १२ ऑक्टोबर रोजी असून, साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला दसरा हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. या दिवशी विजय मुहूर्तावर अनेक लोक आपल्या नवीन उपक्रमाचा आरंभ करतात. हा विजय मुहूर्त महाराष्ट्रात दुपारी २:२२ ते ३:०९ या दरम्यान आहे.

**अष्टमीचा तरी उपवास करावा**

वयोमानामुळे किंवा आरो- ग्यविषयक अडचणींमुळे ज्यांना नवरात्रीचे ९ दिवस उपवास करणे शक्य नाही, त्यांनी उठता- बसता म्हणजे नवरात्रीच्या पहिल्या आणि शेवटच्या दिवशी उपवास करावा. मात्र, तेही शक्य नसल्यास किमान अष्टमीचा उपवास तरी करावा, असे आवाहन पंडित पंकज जोशी यांनी केले आहे.

# 'जीएसआय'ची चमू दाखल जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद

## सौम्य भूकंप : दोन दिवसांनी पुन्हा गावांना भेटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मेळघाटात सोमवारी झालेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या (जीएसआय) चार सदस्यीय चमूने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची मंगळवारी दुपारी भेट घेतली. मेळघाटात सोमवारी बसलेले हादरे हे सौम्य स्वरूपाच्या भूकंपाचे असले तरी हा परिसर स्टेबल असल्याने मोठा भूकंप होण्याची शक्यता नसल्याची माहिती त्यांनी दिल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.




मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात टेटू व आमझरी व परिसरातील गावांमध्ये पुन्हा दोन दिवसांनी पुन्हा हे पथक येणार काही दिवस मुक्कामी राहणार व या भागाची पाहणी करणार असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

जिल्ह्यात टेटू, आमझरी व लगतच्या तालुक्यांमध्ये सोमवारी दुपारी १.३७ वाजता भूकंपाचे हादरे बसल्याने नागरिक भयभीत झाले होते. उर्ध्व वर्धा प्रकल्पस्थळावरील 'सिस्मोग्राफ' आठ वर्षांपासून बंद असल्याने याबाबतची चर्चा जिल्ह्यात होत आहे. भूकंपमापकसिस्मोग्राफ) यंत्र हे पुणे, नागपूरसह मोठ्या विभागीय ठिकाणी आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात सिस्मोग्राफ यंत्र लावण्याची आवश्यकता नसल्याची माहिती जिल्हाधिकारी कटियार यांनी दिली.

**भूकंपबाधित भागात पथकाद्वारे स्टडी, रिसर्च**

जीएसआयच्या वरिष्ठ शास्त्रज्ञांसह त्यांचे तीन सहकारीशा चार शास्त्रज्ञांच्या चमूने मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधला. हे पथक पुन्हा दोन दिवसाला भूकंपबाधित भागाला भेटी देऊन त्या भागाचा अभ्यास आणि संशोधन करणार आहे. दरम्यान भूकंपाच्या हादऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची माहिती यंत्रणेद्वारा घेतली जात आहे.

# ४,५०० रुपयांत पितळाचे दोन हंडे घेतले, त्यावर एकनाथ शिंदेंचे नाव टाकले; लाडक्या बहिणीच्या प्रेमाने मुख्यमंत्री भावूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ मुंबई :**

राज्यात लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर महिलांचा तुफान प्रतिसाद या योजनेला मिळत आहे. राज्य सरकारच्यावतीने रक्षाबंधन सणाचा मुहूर्त साधत महिलांच्या बँक खात्यात दोन महिन्यांचा एकत्र हफ्ता म्हणून ३००० रुपये जमा करण्यात आले. पहिल्या टप्प्यात जवळपास सव्वा कोटी महिला भगिनींना या योजनेचा लाभ मिळाला. त्यामुळे, महिलांनी समाधान व्यक्त केलं असून अनेकांनी राज्य सरकारचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका लाडक्या बहिणीची भेट घेतली होती. या बहिणीने योजनेतून मिळालेल्या ३००० रुपयांतून चक्क घुंगरु टाळचा व्यवसाय सुरू केल्याचं पाहायला मिळालं. आता, धुळे जिल्ह्यातील एका लाडक्या बहिणीने मिळालेल्या ४५०० रुपयांतून चक्क दोन पितळाची हंडी विकत घेतली असून त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं नाव टाकलं आहे.

धुळे जिल्ह्यातील या लाडक्या बहिणीचं प्रेम पाहून मुख्यंमत्री एकनाथ शिंदे भावूक झाले आहेत. या घटनेनंतर विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला प्रत्युत्तर देत, लाडक्या बहिणींकडून मिळत असलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "१५०० रुपयांत काय होते, असा प्रश्न विरोधकांकडून उपस्थित केला जात असला तरी आमच्या बहिणींना मायेची भेट देण्याचे समाधानच इतके मोठे होते की क्षुल्लक टीका आम्ही नजरेआड केल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर आजवर मनाला मुरड घालत असलेल्या आवडीच्या गोष्टी कुणी घेतल्या, कुणी छोटेखानी व्यवसाय केला. आम्ही देत असलेली ओवाळणी बहिणी प्रेमाने स्वीकारत आहेत, यातच आमचा आनंद आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलंय. तसेच, धुळ्यातील एका भगिनीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून मिळालेल्या ४५०० रुपयांतून पितळ्याचे दोन हंडे विकत घेतले आणि त्यावर भावाकडून सप्रेम भेट म्हणून माझे नाव टाकले, ते पाहूनही आनंदाश्रू तरळले असं भावनिक ट्विट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या अधिकृत अकाऊंटवरुन केलंय.

# अमरावती महानगरपालिकेने 'स्वच्छता ही सेवा रॅली' द्वारे केला स्वच्छतेचा जागर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

स्वच्छता हि सेवा अंतर्गत स्वच्छता पंधरावडा म्हणुन साजरा करण्याच्या अनुषंगाने तसेच महात्मा गांधी व देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्य अमरावती महानगरपालिके तर्फे आज स्वच्छता ही सेवा रॅलीचे आयोजन करण्यात आले.यामध्ये महानगरपालिके मधील सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने स्वच्छतेचा संदेश या रॅली मार्फत सर्व शहरातील नागरीकांना देण्यात आला.

स्वच्छता रॅलीमध्ये विविध नुक्कड नाटकामधून प्लास्टिक बंदी, दैनंदिन परिसर, घरगुती, सार्वजनिक स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात आली. पथनाटये तसेच रॅली दरम्यान स्वच्छता व आरोग्य याबाबत प्रबोधन करून उद्बोधन व मार्गदर्शन करण्यात आले.केंद्र सरकारने जाहीर केलेला स्वच्छोत्सव यशस्वी करण्यासाठी स्वच्छता ही सेवा रॅलीत एवढ्या मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचे कौतुक महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी केले.

महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी झेंडा दाखविल्यानंतर रॅलीला प्रारंभ झाला. या रॅलीमध्ये स्वच्छता संदेशांचे फलक झळकवित स्वच्छ, सुंदर, प्लास्टिक मुक्त अमरावती शहराचा दमदार प्रचार करण्यात आला. त्यासोबतीने कचरा वर्गीकरण, कच-याची विल्हेवाट, प्लास्टिक वापराला प्रतिबंध अशा स्वच्छताविषयक विविध घोषणांनी सारा परिसर दणाणून गेला. रॅलीची सांगता होत असतांना 'ओला, सुका व घातक' कचरा वर्गीकरणाविषयी हसतखेळत संदेश देणा-या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. त्याला उपस्थितांची उत्तम दाद मिळाली. महानगरपालिकेने आयोजित केलेली ही 'स्वच्छता ही सेवा रॅली' अधिकारी, कर्मचारी, शिक्षक वर्ग व विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी एकत्र येत स्वच्छतेचा जोरदार जागर करीत यशस्वी केली.

या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर उपस्थित होते.

# नवरात्रीत उपवास महागणार; शेंगदाणा, भगरीचे दर वाढले; भाविकांचा सवाल : उत्सवकाळातच भाववाढ का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

नवरात्रोत्सवात नऊ दिवस भाविक मोठ्या भक्तिभावाने उपवास करतात. उपवासाच्या पदार्थांना मागणी कायम असते. त्या पार्श्वभूमीवर बाजारात शेंगदाणे, साबुदाणा, भगरीची आवक मोठ्या प्रमाणात होते. मात्र यंदा साबुदाण्याचे दर स्थिर असून, शेंगदाणा आणि भगरीचे भाव किलोमागे चार ते सात रुपयांनी वाढले आहेत. ऐन



उत्सवाच्या काळात ही दरवाढ झाल्याने भाविकांमध्ये संताप व्यक्त केला जातआहे.

मागील वर्षीच्या तुलनेत उपवासाच्या पदार्थांचे दर वाढल्याने सामान्य नागरिकांना उपवास करणेही महागात पडणार आहे. त्यामुळे यंदा नवरात्रोत्सवातील उपवास आता सामान्यांच्या खिशाला भुर्दंड पाडणारा आहे. तरीसुद्धा भाविक उपवास करून नवरात्रोत्स साजरा करणारच आहेत.तामिळनाडू, कर्नाटक आणि विदर्भाच्या काही भागांतून होते, तर पश्चिम महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमधील कच्च्या मालावर प्रक्रिया करून मार्केटयार्डात आवक होते.

तामिळनाडूतील सेलम जिल्ह्यातून, तर महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातून साबुदाण्याची आवक होते.

तर शेंगदाणा कर्नाटक,गुजरात राज्यातून आवक होते,नवरात्रोत्सवामुळे भगर, साबुदाणा, शेंगदाणे व अन्य साहित्याची मागणी वाढते. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून दर वाढविले जातात. जिल्ह्यात नवरात्रोत्सवात ७० ते ८० टन साबुदाण्याची अधिकची आवक होते, असे एका व्यापाऱ्याने सांगितले.

**असे आहेत दर**

साबुदाणा ७० ते ७५
भगर १०५ ते ११०
शेंगदाणे ११० ते १२०

दरवर्षी सण- उत्सवात विविध पदार्थ तसेच साहित्याचे दर वाढविले जातात. यामुळे भाविकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. यंदाही काही प्रमाणात दर वाढलेले आहेत. याचा फटका सामान्य ग्राहकांना बसत आहे. उत्सवात तरी दर नियंत्रणात ठेवावे, तेव्हाच दिलासा मिळेल.

# प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या शुभ हस्ते ९ ऑक्टोबर ऑनलाईन पद्धतीने अमरावती मेडीकल कॉलेजचे भूमिपूजन

## केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व हसनजी मुश्रीफ मंत्री यांची राहणार उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या शुभ हस्ते दि. ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी ऑनलाईन पद्धतीने आयोजीत केलेल्या कार्यक्रमाद्वारे अमरावती मेडिकल कॉलेजचे भुमिपूजन नियोजीत मौजे इलाहाबाद या जागेवर भुमिपूजन होणार आहे व या कॉलेजमध्ये १०० पात्र चइइड विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेश देतील या आयोजीत केलेल्या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा व मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, वैद्यकिय शिक्षणमंत्री हसनजी मुश्रीफ आदि मंत्री



उपस्थित राहतील.विशेषत: मा.खा.नवनित रवि राणा व आ.रवि राणा यांनी केला होता सतत पत्रव्यवहार व मेडिकल कॉलेजसाठी पाठपुरावा त्यांच्या पाठपुराव्याला यश येऊन केंद्र सरकारचे आरोग्य व कुंटुब कल्याण मंत्रालयाचे डेप्युटी सेक्रेटरी पुनम मीना यांनी त्यांच्या स्वाक्षरीचा आदेश निर्गमीत केला आहे.

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अमरावती या कॉलेजची बिल्डींग मौजे इलाहाबाद जागेवर प्रधानमंत्री यांच्या शुभ हस्ते भुमिपूजन होणार आहे. या ऑनलाईन होणाऱ्या कार्यक्रमामध्ये ऑफलाईन इलाहाबाद येथे कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष मा.डॉ.अनिलजी बोंडे (राज्यसभा खासदार) मा.खा.नवनित राणा व आ.रवि राणा व भाजपा पदाधिकारी उपस्थित असणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण भाजपाचे नेते किरण पातुरकर व युवा स्वाभिमानचे पदाधिकारी किरण अंबाडकर हे सर्वांना निमंत्रण देतील.

# दुर्गंधीयुक्त ज्वारी घेऊन शिवसेनेच्या नेतृत्वात महिलांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२ अमरावती**

सरकारी स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाची ज्वारी वाटप होत असल्याने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील महिलांनी ठाकरे गटाच्या शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे टेबलवर दुर्गंधीयुक्त ज्वारी व भाकरी टाकुन संताप व्यक्त करीत सरकार सर्व सामान्य कुटुंबाच्या आरोग्याशी खेळ खेळत असल्याचा आरोप करीत निवेदन सादर करून समंधीतावर योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली. महिण्याच्या शेवटी स्वस्त धान्य दुकाना मार्फत सरकार कडून आलेले गहू, ज्वारी, तांदूळ, मका इत्यादी धान्याचे वाटप केले जाते मात्र सदर सरकार कडून वाटप करिता आलेली धान्य योग्य आहेकी नाही याची तपासणी केली जाते त्यानंतर सदरहू धान्य वाटप केले जातात मात्र नांदगाव खंडेश्वर तालुक्यात या महिन्यात आलेली ज्वारी अंत्यत निकृष्ट दर्जाची असुन सदर ज्वारीची दुर्गंधी येत असुन त्यात (डश) जास्त प्रमाणात आहे ज्वारीत बोंड्या आहे खाण्या योग्य ज्वारी नसून त्या पासून बनलेली भाकर सुद्धा दुर्गंधी मारत आहे त्यामुळे सर्व सामान्य गोर गरिबांच्या कुटुंबाच्या आरोग्यासा धोका निर्माण होऊ शकतो म्हणुन तात्काळ ज्वारीचे धान्य परत करून समंधीत पुरवठा अधिकारी यांचेवर तात्काळ निलंबानाची कार्यवाही करावी अन्यथा पुरवठा विभागास बांगड्यांचा आहेर घालू असा ईशारा महिलांनी दिला यावेळी शिवसेनेचे विधानसभा उपसंघटक बाळासाहेब राणे शिवसेनेचे प्रकाश मारोटकर लिलाधर चौधरी बबलू सोनोने शारदाबाई सोनोने अनिता भंडारे लीलाबाई चौधरी जया नेवारे वर्षा चौधरी सारिका राऊत प्रणाली ठाकरे शिला चौधरी इत्यादी महिला उपस्थित होत्या

# सततच्या पावसाने मूर्तिकार हैरान : मूर्ती वाळण्यासाठी करतात विविध जुगाड़

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

आतापर्यंत पावसाने हजेरी लावली असून दमदार नसला तरी दररोज पावसाच्या बरसत असून दिवसभर ढगाळ दाटून राहत आहेत. अशातच पावसाचा जोर कमी होऊन उन्ह तापू लागल्याने मूर्तीकारांना दिलासा मिळाला होता मात्र नवरात्राच्या एक दिवस आधी पुनः पावसाने हजेरी लावल्यामुळे मूर्तीना वाळवण्यासाठी मूर्तिकार विविध प्रकारचे जुगाड़ लावत आहे मात्र मूर्ति पूर्ण पने न सुखल्याने मूर्तिकार सध्या या पावसाने हैरान झाले आहेत

उद्या गुरुवारपासून (दि.३) नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून माँ दुर्गेच्या या नऊ दिवसांच्या उत्सवासाठी सर्वत्र लगबग दिसून येत आहे. मंडळाकडून मंडप, देखावे, बँड- बाजा, पूजा साहित्य आदी तयारींसाठी धावपळ सुरू असताना दिसत आहे. तर सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे मातेच्या मूर्ती तयार करण्यासाठी मूर्तीकारांची चांगलीच दमछाक होत आहे.त्यात डॉन दिवस उन



तापल्यानंतर आज पुन्हा पावसाने हजेरी लावली आहे

मूर्तीकारांनी मूर्ती तयार करून ठेवल्या आहेत अनेक मुर्त्या त्यार सुधा झाल्या आहेत , मात्र मातीचा लेप ओला असल्याने तो वाळत पर्यंत रंग व सजविण्याचे काम होत नाही. त्यात आतापर्यंत दररोज पावसाच्या हजेरी

लावत असून ढगाळ वातावरणामुळे मूर्ती ओल्याच होत्या. परिणामी मूर्तीकार व मंडळाचे कार्यकर्तेही टेन्शनमध्येच होते.मात्र मागील एक-दोन दिवसांपासून दिवसा पावसाने हजेरी लावली नसून चांगले उन्ह तापू लागल्याने मूर्तीकारांना तेवढाच दिलासा मिळाला आहे. देवीच्या मूर्ती वाळण्यासाठी त्यांनी उन्हात ठेवल्याचे दिसत आहे. नवरात्रोत्सवाला आता काही तासांचा अवधी उरला असल्याने मूर्तीकार आता सहकुटुंब मूर्ती तयार करण्यासाठी रात्र दिवस एक करून काम करताना दिसत आहे.

**मांडव बांधकामालाही आला जोर**

दुर्गा उत्सवात विविध मंडळांकडून विविध प्रकारचे मांडव व देखावे तयार केले जातात. मात्र पावसामुळे त्यांचेही काम अडकून पडले होते. आता वातावरण उघडले असल्याने व नवरात्रोत्सवाला काही तासांचा अवधी उरला असल्याने मांडव तयार करणारे कारागीर सुद्धा रात्रंदिवस एक करून मांडव पूर्ण करण्यासाठी भिडले आहेत.